श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक

वर्ष २० ] एप्रिल, मे, जून १९४३ [ अंक ४-५-६

बाबा बाबा, निशिदिनि मना बोल रे बोल बाबा ॥
बाबा नामीं कितितरी असे दिव्य जादु अबाबा ॥



बा बाळिस त्यज चरण, जा त्या न भूप नवाबा ॥
बा मागा ना, तुज यमगृहीं जावयाची जबाबा ॥

नलिनिदिलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका भवति भवार्णवतरणे नौका ॥ १ ॥

—शंकराचार्य

१०—७—४३

संपादकः—श्रीधर नारायण खारकर

# श्री साईलीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदकपार्श्वतो योजनैकम् ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधिम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साईनाथः ॥

वर्ष २० } एप्रिल, मे, जून १९४३ { अंक ४–५–६

## वन्दे महापुरुष ते चरणारविन्दे

संसारसागरसमुत्तरणैकमंत्रं ब्रह्मादिदेवपूजितसिद्धमंत्रम् ।
दारिद्र्यदुःखमयशोकविनाशमंत्रं वन्दे महाभयहरं गुरुराजमंत्रम् ॥

## श्री गुरुगीता

मनीं आठवितां साई – तोचि सर्व सुखा देई ।
जळीं स्थळीं आकाशीं – व्यापक तोचि सर्व देशीं ॥
हृदयीं प्रगटे भास्कर – सर्व दीप्ति सर्वेश्वर ।
दयानिधि अमृतकरें – तोषवी दासातें सत्वरें ॥

माधव आडकर

## श्रीसाईनाथ प्र०

(श्री. प. प. नारायणाश्रम स्वामी) पूर्वाश्रमींचे बाबांचे भक्त (टोसर यांचे भजनांत म्हणण्यांत येणारीं स्तोत्रें, अष्टकें, पदें वगैरे)

## "श्रीरुद्राष्टकं"

नमामीशमीशान् निवार्णरूपं ॥ विभुं व्यापकं ब्रह्मवेदस्वरूपम् ॥
अजं निर्गुणं निर्विकल्पं निरीहं ॥ चिदाकाशमाकाशवासं भजेऽहं ॥ १ ॥
निराकारमोंकार मूलं तुरीयं ॥ गिराज्ञानगोतीतमीशं गिरीशम् ॥
करालं महाकालकालं कृपालुं ॥ गुणागार संसार पारं नतोऽहम् ॥ २ ॥
तुषाराद्रिसंकाशगौरं गभीरं ॥ मनोभूतकोटिप्रभाश्री शरीरम् ॥
स्फुरन्मोलिकल्लोलिनीचारुगंगं ॥ लसद्भालबालेंदु कंठे भुजंगम् ॥ ३ ॥
चलत्कुंडलं शुभ्रनेत्रं विशालं ॥ प्रसन्नाननं नीलकंठं दयालम् ॥
मृगाधीशचर्मांबरं मुंडमालं ॥ प्रियं शंकरं सर्वनाथं भजामि ॥ ४ ॥
प्रचंडं प्रकृष्टं प्रगल्भं परेशं ॥ अखंडं अजं भानुकोटिप्रकाशम् ॥
त्रयीशूलनिर्मूलनं शूलपाणिं ॥ भजेऽहं भवानीपतिं भावगम्यम् ॥ ५ ॥
कलातीतकल्याणकल्पांतकारिन् ॥ सदा सज्जनानंददातः पुरारे ॥
चिदानंदसंदोहमोहापहारिन् ॥ प्रसीद प्रसीद प्रभो मन्मथारे ॥ ६ ॥
नयावदुमानाथ पादारविंदम् ॥ भजंतीह लोके परेवा नराणाम् ॥
नतावत्सुखं शांतिसंतापनाशं ॥ प्रसीद प्रभो सर्व भूताधिवासम् ॥ ७ ॥
न जानामि योगं जपं नैवपूजां ॥ नतोऽहं सदासर्वदा शंभु तुभ्यम् ॥
जराजन्मदुःखौघतातप्यमानं ॥ प्रभो पाहिमापन्न मामीशशंभो ॥ ८ ॥

## जोगी श्रीक्षेत्र शिरडी

(१)

सांइ मूर्शद पुकारु अलंमें । मेरा सांइ बसा है जिगरमें ॥ ध्रु ॥
जिसने भक्ति का खेतर लगाया । उसमें भक्तन् का बीज बोया ॥ १ ॥
झूटी माया और फंदसे छुडाया । आगे परब्रह्म सहेल बताया ॥ २ ॥
जो साईकदमपर सोया । उसको देखत जमराज रोया ॥ ३ ॥
यह कहती है नादान हीरा । गुरुज्ञानी करो ख्याल गहेरा ॥ ४ ॥

[२]

(चाल—जिआमें लागि आन न्यान)

नसे दुजाहि देवभाव ॥ २ ॥ प्यारे त्रश करुं ॥ हरिला ॥ प्यारे० ॥
सत्कृतींत देह जावो ॥ नसे० ध्रु० ॥
सांइ गुरुमाय मायाळू अती । ब्रम्हज्ञानरुपी दुग्ध पाजी ती ।
धेनू वत्सालागीं येणेंच रीती । मी अनाथ धांव पाव ॥ नसे० ॥ १ ॥
संतभक्त बंधुसखे । नामघोषीं मनहरिखे ॥
भवभय भीति उरली न त्या । विठ्ठलचरणी देती ठाव ॥ २ ॥

श्रीदत्त चित्साइसद्गुरुभ्योनमः

# बाबांचें विश्वविद्यापीठ.

## १. व्याख्या

विश्वाभासरजनी मावळवून, आत्मतत्त्वचंडांशूचें सम्यक् ज्ञान करून देऊन, आत्मस्वरूप तेजोगोलकाचें दर्शन, प्राप्ति व शाश्वत सुखशांतीचा यथेच्छ लाभ करून देणारें शिक्षण ज्या ठिकाणीं मिळतें तें बाबांचें विश्वविद्यापीठ.

## २. विभाग

माझ्या अत्यल्पमतें, बाबांच्या विश्वविद्यापीठाचे पांच विभाग करतां येतील व शिरडीस त्या त्या विभागांचीं निरनिराळीं स्थलेंहि कल्पितां येतील.

१ बालविद्या विभाग, २ मध्यमविद्या विभाग, ३ उच्चविद्या विभाग, ४ प्राज्ञविद्या विभाग, ५ श्रेष्ठविद्या विभाग.

१ अंतर्बाह्य (शरीर व चित्त) शुद्धीकरतां, स्नानसंध्यादि विहित कर्मे, नामस्मरण, भजन, पूजन, अर्चन, कीर्तन, धर्मग्रंथपठन, श्रवण व कथनादि नवविधा भक्तिपूर्वक, सुलभ कर्माधिकारी मंदमुमुक्षु भक्तसमूह ज्या विभागांत अभ्यास करतो तो बालविद्यापीठ विभाग, व याचें स्थल बाबांचें समाधिमंदिर. ( श्रीमंत बुटीसाहेबांनीं बांधलेलें ).

२. अंतर्बाह्य शुद्धीकरतां आत्मसंयमनयुक्त, वर्णाश्रम धर्म, नियम, कृच्छ्र चांद्रायणादि व्रत परिपालनानुष्ठानाधिकारी मुमुक्षु भक्तगण, ज्या विभागांत अभ्यास करतो तो मध्यम विद्यापिठ विभाग व याचें स्थल बाबांच्या गुरुरायांचें समाधिस्थान. ( श्री. नवलकरांचा वाडा ).

३. केवळ चित्तशुद्धीकरतां, श्रीमद्भगवद्गीता, ब्रह्मसूत्र, उपनिषदादि वेदान्त ग्रंथाध्ययन, पठन, श्रवण, कथन, मनन, निदिध्यासन, ब्रह्मचिंतन, कर्मब्रह्मार्पणादि उपासनाधिकारी छात्रसंघ ज्या विभागांत अभ्यास करतो तो उच्च विद्यापीठ विभाग. व याचें स्थल बाबांचें शयनागार (चावडी ).

४. धौति, बस्ति, नेति, नौलि, भाटक, कपालभातिक्रियायुक्त, भीषण व उग्र तपस्यान्वित, खंड हटादि योगाधिकारी, तीव्र मुमुक्षु भक्तसंघांत, ज्या विभागांत अभ्यास करतो, तो प्राज्ञविद्यापीठ विभाग. व याचें स्थल बाबांचें तपोध्यान. ( श्री साइप्रधान लेंडी बाग ).

५. सम्यगात्मज्ञान, पूर्ण व कडकडीत वैराग्य, अलोट गुरुकृपा, सच्चिदानंदस्थिति सहज समाधिस्थिति, नित्य संतोष, अखंड सुख, शाश्वत् शांति अतएव सायुज्य मुक्त्यधिकारी, तीव्र मुमुक्षु छात्रवृंद ज्या विभागांत अभ्यास करतो तो श्रेष्ठ विद्यापीठ विभाग व याचें स्थल बाबांची श्री द्वारकामाई.

## ३ केंद्र, अध्यापक, शिक्षण व आसन.

( शार्दूलविक्रीडित )

**वैराग्योदधि, शांतिसौख्यजलधी, ज्ञानांबुधी शैलधी[१] ॥**
**मुख्याध्यापक, संतकेसरि वसे, ज्या ठायिं ती शैलधी[२] ॥**
**ज्या साईगुरु, दत्त, कृष्ण, वदती जो आत्मरूपस्थ[३] हो ॥**
**देई शिक्षण, जेथ बैसुनि सदा ती द्वारकामाइ हो ॥**

या विश्वविद्यापीठाचें **केंद्र**स्थान फक्त एक **शिरडीच**. यांतील **मुख्याध्यापक** सर्व विश्वांत फक्त एक **बाबाच**. यांतील मुख्य व अंतिम **शिक्षण** फक्त एक **सायुज्य मोक्षच**. यांतील मुख्याध्यापकाचें बसण्याचें **मुख्यासन** फक्त एक **द्वारकामाईच**.

## ४. विश्वविद्यापीठांतील उपशिक्षक.

जसे हल्लीं विद्यापीठांत ( कालेजांत ) स्वतः पुढील अभ्यास करण्याकरतां व उच्च-वर्गांतील विद्यार्थ्यांस शिकविण्याकरतां विद्वान वेतनी उपशिक्षक विद्यार्थी ( फेलो ) नेमतात किंवा उच्च विद्यालयांत ( हायस्कुलांत ) विनामूल्य उपगुरु ( मॉनीटर ) ठेवतात, तसें बाबा कधीं कधीं आपल्या हाताखालीं कै. भक्तवर्य नानासाहेब चांदोरकर, काकासाहेब दीक्षित, माधवराव देशपांडे, आण्णासाहेब दाभोळकर, दासगणू महाराज वगैरे भक्तां-सारख्या भक्तांना बिनवेतन उपशिक्षकाची हलकी कामगिरी सांगून त्यांचेकडून आपलें विश्वविद्यापीठांतील शिक्षणाचें काम करून घेत.

१. आपण स्वतः न सांगतां, न करतां व न पोंचवितां, आपला निरोप सांगण्याचें, उपदेश करण्याचें किंवा जप, तप, मंत्र नामादि आदेश, आपल्या कांहीं इतर विवक्षित भक्तांना पोंचविण्याचें काम, कांहीं प्रसंगीं, बाबा नानासाहेब चांदोरकरांकडे देत. तसेंच बाबांच्या सांकेतिक किंवा गूढ शब्दांचा स्पष्टार्थ करून सांगण्याची, बाबांच्या पुण्यलीला कथन करून मुमुक्षु जिवांची किंवा इतर भक्ताभक्तजनांची, विशेषतः पदवीधर विद्वानांच्या मनाची प्रवृत्ति सन्मार्गाकडे वळविण्याची कामगिरी ही त्यांचेकडेच असे.

२. बाबांकडून कांहीं भक्तांचीं कोडीं उलगडून घेण्याची व त्यांची समजूत करून देण्याची साधारणपणें कोणास न साधणारी कामगिरी माधवरावांकडे असे. तसेंच बाबांच्या वतीनें कोणा भक्ताकडे जाऊन त्याचें कार्य निर्विघ्नपणें पार पाडून देण्याची, किंवा त्याचे-कडे कांहीं काळ वास करून त्याचे जिवास समाधान करून देण्याची, बाबांविषयक स्वप्नाचा अर्थ करण्याची, बाबांकडे येणारे भक्तांची बाबांच्या आज्ञेप्रमाणें व्यवस्था राखून इतरांस किता घालून देण्याची, बाबांच्या कथा व लीला सर्वांस सांगून बाबांच्या आत्म-ज्ञानाचा व सगुण भक्तीचा सर्वत्र प्रसार करण्याची कामगिरी **माधवराव देशपांडे** यांचेकडे होती.

---

१ पर्वताप्रमाणें विशाल बुद्धि. २ पर्वताप्रमाणें विशाल बुद्धीचे संतमहात्मे ज्या ठिकाणीं राहतात ती शैलधी ( शिरडी ). ३ जीवशिवापलीकडील परमात्म स्वरूप.

३. दररोज पोथी वाचते वेळीं त्यांत निघालेल्या त्या वेळच्या श्लोकार्थावरून किंवा श्लोकभाष्यावरून बाबांच्या सांकेतिक किंवा गूढ शब्दांचें, वाक्यांचें किंवा निरोपांचें स्पष्टीकरण करून देऊन, भक्तांच्या शंकांचें निरसन—समाधान व उलगडा करून सांगण्याची कामगिरी काकासाहेब दीक्षितांकडे होती. त्याचप्रमाणें बाबांच्या लीला, स्वानुभव व भक्तानुभव लोकांना सांगून मुमुक्षु व इतर विद्वजनांना बाबांच्या व्यवहारदक्षतेची व तत्त्वज्ञानाची जाणीव करून देणें ही कामगिरी काकासाहेबांकडेच होती. तसेंच बाबांच्या आज्ञेचें अक्षरशः परिपालन कसें करावें याचें स्वतःच्या आचरणानें इतरांस कित्ता घालून देण्याची कामगिरी पण त्यांच्याकडेच असे.

४. देवगिरीचे यदुवंशविलास, सकलकला निवास, न्याय पोषक क्षितीश श्रीरामचंद्र ( श्री ज्ञा. अ. १८ ओं १८०५ ) दौलताबादेचे राजे श्रीरामदेवराव जाधव यांचे पदरीं १३ वे शतकांत असलेले विद्वान, हिशोबी व ग्रंथकर्ते मंत्री हेमाद्रि उर्फ हेमाडपंत यांचेप्रमाणें बाबांनीं आण्णासाहेब दाभोळकरांना हेमाड हें सूचक नांव देऊन त्यांना आपल्या दरबारचे पहिलेच हिशोबनीस म्हणून शिरडी संस्थानचे हिशोब लिहिण्याची गोड कामगिरी सांगून, त्यांचेकडून ही हेमाद्रीच्या विख्यात ‘ चतुर्वर्ग चिंतामणी ’ नामक गीर्वाण ग्रंथाच्या तोडीचा मायभाषेंत ‘ श्रीसाईसच्चरित्र ’ नांवाचा अलौकिक ग्रंथ लिहवून घेऊन मुमुक्षुजनांना वर्णाश्रमधर्मपरिपालन व भक्तिज्ञान वैराग्याचें योग्य शिक्षण देण्याची अमोल कामगिरी त्यांना दिली होती.

५ महाराष्ट्रांतील विख्यात संतकवि श्री महीपती यांनीं वर्णिलेल्या संतचरित्रानंतर महाराष्ट्रांत जे प्रसिद्ध संत होऊन गेले त्यांचीं चरित्रें लिहिण्याची आज्ञा बाबांनीं श्री दासगणू महाराजांना केली. त्याप्रमाणें त्यांनीं तीं चरित्रें आपल्या “ श्रीभक्तलीलामृत ” व “ श्रीसंतलीलामृत ” या दोन ग्रंथांत सुंदर, रसाळ व प्रतिभासंपन्न मराठी भाषेंत लिहून संतचरित्रामृतपानापासून मिळणाऱ्या शिक्षणाचा लाभ मराठी जाणणाऱ्या हिंदुस्थानांतील बहुतेक आबालवृद्ध भाविक मुमुक्षुजनांस करून दिला.

तसेंच त्यांना बाबांनीं “ ईशावास्योपनिषदा”चा अर्थ लिहिण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें दासगणू महाराजांनीं त्या उपनिषदाचा अर्थ करून प्रसिद्ध केला व त्यायोगें लोकांना त्याच्यापासून मिळणाऱ्या उच्चतम उपनिषदीय ज्ञानाच्या शिक्षणाचा लाभ करून दिला.

त्याचप्रमाणें बाबांनीं त्यांची प्रवृत्ती अन्य कवित्व करण्याकडून काढून, भगवन्नामसंकीर्तन करण्याकडे वळवून, नारदीय थाटाचें कीर्तन करीत जाण्याची त्यांना आज्ञा केली. त्या आज्ञेनुसार दासगणू महाराजांनीं करुणरसप्राधान्य संतचरित्रांवर बरीचशीं आख्यानें स्वतः रचून कीर्तनें बाबांच्या समोर केलीं व त्यानंतर ते हल्लींही करीत आहेत व त्याद्वारें बाबा त्यांचेकडून परमेश्वराचें अस्तित्व, संतांची अगम्य लीला, सत्ता, योग्यता व अलौकिक कर्तृत्व यासंबंधांचा पाठ, अखिल मातृभूतील मायभाषा जाणणाऱ्या भाविक मुमुक्षु जनतेला देत आहेत. व परमपवित्र अशा शिक्षणाचें कार्य करून घेत आहेत.

## ६ विद्यापीठांतील शिक्षणाची वेळ व अनाध्याय

बाबांची शिक्षण देण्याची वेळ हल्लींच्या शिक्षण खात्यांतील विद्यापीठ ( कालेज ) व विद्यालयाच्या ( हायस्कूलच्या ) नियमित व कालखंड शिक्षण वेळेसारखी नव्हती. बाबांना वेळेचे खंडही पाडावे लागत नसत. विद्यार्थ्यांची तयारी, उत्साह, उत्कंठा, उपजीवनाच्या धंद्याशीं निगडीत झालेला काल, शरीरप्रकृति यांकडे पूर्ण लक्ष देऊन बाबा विद्यार्थ्यांना शिक्षण देत. ते २४ तास शिक्षण देत. शिक्षणाचे वेळीं विद्यार्थ्यास झोंप येऊं लागली तर ' थोडीशी झोंप घेऊन मग ये ' असें सांगत. त्यास भूक लागली असेल तर ' जा खाऊन ये ' असें सांगत. विद्यार्थी कंटाळला तर बाबा कधीं कंटाळत नसत. ते सदा सर्वकाळ अत्यंत उत्साहानें अध्यापनाचेंच काम करीत. हल्लींच्या विद्यापीठांतील किंवा विद्यालयांतील मनसोक्त सुट्या घेण्याची बाबांची पद्धत नव्हती व नाहीं. अनाध्याय, सुटी किंवा विश्रांति हे शब्द त्यांचे कोशांतच नव्हते. रविवार असो, गुरुवार असो, सण असो, उत्सव असो किंवा शिष्टागमन असो बाबांचें अध्यापन जागृत, स्वप्न, समाधींत चालूंच असावयाचें व आहेही.

## ७ विद्यापीठांत येणारे विद्यार्थ्यांची जाति, लिंग धर्म, स्वभाव प्रकृति वगैरे

बाबांच्या विद्यापीठांत, सर्व जातींचे सर्व धर्मांचे स्त्रीपुरुष, मुलें, सशक्त, अशक्त, रोगी, निरोगी, सुस्वभावी, दुःस्वभावी, व्यंगी, अव्यंगी, अस्तिक, नास्तिक, भक्त अभक्त, स्वार्थी, परमार्थी, विद्वान्, अविद्वान्, ज्ञानी, अज्ञानी, संसाररागी, संसारत्यागी, भोळे, दक्ष, सांव, चोर, व्यसनी, निर्व्यसनी, स्तुतिपाठक, निंदक, टीकाकार, धार्मिक, अधार्मिक, श्रद्धालु, अश्रद्धालु, श्रीमंत, गरीब, शास्त्री, पंडित, पुराणिक, वैदिक, याज्ञिक, अधिकारी, अनधिकारी, नोकर, व्यवहारी, अव्यवहारी, उद्योगी, निरुद्योगी, व्यापारी, अव्यापारी, उच्च, नीच वगैरे सर्व अधिकाराचे, धंद्याचे, स्वभावाचे व प्रकृतीचे विद्यार्थी येत व हल्लींही येतात.

## ८ विद्यापीठांतील प्रवेश परीक्षा व प्रवेश शुल्क ( FEES )

बाबांच्या या विद्यापीठांत प्रवेश होण्यास प्रथम कोणास प्रवेश परीक्षा किंवा प्रवेश शुल्क ( fee ) ही द्यावें लागत नसे. पण पुढें पुढें विद्यार्थ्यांची जसजशी अनपेक्षित व असंख्य गर्दी होऊं लागली तसतशी परमार्थविरोधक व विघातक बृहदारण्यकोपनिषदांत सांगितलेल्या चार एषणा (इच्छा) पैकीं पहिल्या दोन एषणा ( द्रव्य व स्त्री ) मुमुक्षु विद्यार्थ्यांचे मनांतून थोड्या प्रमाणांत तरी कमी झाल्या आहेत किंवा नाहींत हें पहाण्याकरितां, बाबांनीं दक्षिणा व श्रीराधाकृष्ण आई ह्या दोन कसोट्या ( परीक्षा ) किंवा चाळणी शिरडींत आपल्या जवळ निर्माण केल्या. अर्थात या कसोट्यास जे उतरतील, किंवा या चाळणींतून जे वर राहतील, त्यांनाच त्यांच्या अधिकारपरत्वें, त्या त्या विद्यापीठ विभागांत, प्रवेश मिळत असे व हल्लींही मिळतो.

## ९ विद्यापीठांत शिकविले जाणारे विषय

बाबांच्या विद्यापीठांत बारीकसारीक, लहान मोठे, सोपें अवघड, असे अनंत विषय शिकविले जातात. पण स्थूल दृष्ट्या त्यांचे दोनच मुख्य भाग पाडतील.

१ व्यवहार–दक्ष होऊन न्यायानें धन मिळवावें व त्याचा न्यायानें खर्च करावा. सदाचरणानें, स्वधर्मपरिपालनानें (काल व परिस्थिति लक्षांत घेऊन) नेकीनें, नेटका संसार करणें. संसारास कंटाळूं नये. निरुद्योगी राहूं नये. लोकसंग्रह करावा.

२ गुरु, माता, पिता, गांव मातृभू माता यांची निरंतर सेवा करून भक्ति, ज्ञान, वैराग्य या साधनांनीं संपन्न होऊन आत्मप्राप्ती करून घेणें.

## १० विद्यापीठांतील अभ्यासक्रम

शरीरशुद्धि, चित्तशुद्धि, आत्मसंयमन, विहित कर्माचरण, नियम, व्रतपरिपालन, उपासना, तपस्या, ब्रह्मचिंतन, कर्मब्रह्मार्पण, नैष्कर्म्य, भक्ति, ज्ञान, वैराग्य, स्थितप्रज्ञत्व, गुणातीतत्व, पुरुषोत्तमत्वप्राप्ति व अंतीं अखंड सच्चिदानंद शांतिसुखाचा लाभ.

## ११ विद्यापीठांतील शिक्षण–माग

या विद्यापीठांत बाबा सर्व ज्ञात, अज्ञात जागतिक भाषेंत शिक्षण देत व हल्लींही देतात.

बाबा मराठी व हिंदी बोलत, हें तर सर्वश्रुत आहे. बाबा एका पठाणापाशीं काकासाहेब दीक्षित व माधवराव देशपांडे यांचे समक्ष श्रीद्वारकामाईत, त्याच्या अरेबिक किंवा फार्शी भाषेंत एकदां बोलत होते असें माधवराव व काकासाहेब नेहमीं सांगत. नानासाहेब चांदोरकरांना बाबांनीं सर्व संस्कृत भगवद्गीता व्याकरणासह शिकविली हें नानासाहेबांनीं स्वतः सांगितल्याचें सुप्रसिद्ध आहे. तसेंच बाबांनीं स्वतः श्री. अबदुल भाईना कुराण ग्रंथ समजावून दिला. लंडनमधील सुप्रसिद्ध डॉक्टर क्यॉलन यांचे घरीं छबि रुपानें वास्तव्य करून ज्या डॉक्टरसाहेबांनीं लिहिलेल्या " Invisible influenee " " अज्ञान सामर्थ्य किंवा प्रेरणा " या पुस्तकाच्या वावटळींतून त्यांना वांचविले ती प्रेरणा बाबांनीं त्यांना इंग्रजी भाषेंतूनच केली. तसेंच बाबांनीं अगदीं अलीकडे म्हणजे ४।५ वर्षांपूर्वीपासून जो सर्व मद्रास इलाखा आपल्याकडे लोहचुंबकाप्रमाणें आकर्षण करून घेतला आहे, त्यांतील स्त्रीपुरुष, मुलांना स्वप्नांतून अनुभव दिले, त्यांची इच्छित कार्यें केलीं, त्यांचें रोग निवारण करून शंकानिरसन केल्या त्या त्यांच्या कानडी, तेलगू, तामील व मल्याळी भाषेंतूनच केल्या. गुर्जर देशस्थ भक्तांना जे अनुभव स्वप्नांतून दिले आहेत ते त्यांच्या गुजराती भाषेंतूनच दिले. यावरून बाबांना ज्ञात अज्ञात जगांतील सर्व भाषा अवगत होत्या हें उत्तम प्रकारें सिद्ध होतें. बाबा सिद्ध, जीवनमुक्त, महा योगेश्वर व जगदात्मे असल्यामुळें त्यांना सर्व भाषांचें ज्ञान असणें साहजिकच होतें व त्या त्या भाषेच्या विद्यार्थ्यास ते त्या भाषेंत शिक्षण देत असत व हल्लींहि देतात हें निःसंशय सत्य आहे.

## १२ विद्यापीठांतील शिक्षणाची अवस्था

आपल्या सर्व शिक्षण संस्थेंत शिक्षण जागृतावस्थेंतच दिलें जातें. बाबांच्या विद्यापीठाचें तसें नाहीं. बाबा सर्व विद्यार्थीजनांना जागृतावस्थेंत, स्वप्नावस्थेंत व समाधि अवस्थेंतंही शिक्षण देत असत व हल्लींहि देतात. त्यांची शिष्यजनांवर प्रीति व भाक्ति अलोट असे व आहे. त्यांचें शिक्षण खऱ्या अंतःकरणाचें होतें व आहे. हल्लींसारखें वेतनिक किंवा धनलुब्ध नव्हतें व नाहीं. कधींकधीं बाबा सहज समाधींत किंवा सहजानंदांत असल्या कारणानें ते झोंपी गेले आहेत किंवा त्यांना डुलकी लागली आहे असें जरी वाटे तरी बाबा सदैव जागृतच असत व आहेत. त्यांना झोंप किंवा डुलकी कधींहि येत नसे व नाहीं. त्यांचा भक्तप्रेमाब्धि कधींहि आटला नव्हता व नाहीं किंवा वरवर दिसणाऱ्या क्रोधरूपीं वडवानलानें तो कधीं शुष्कहि होत नसे व हल्लींहि होत नाहीं.

## १३ विश्वविद्यापीठाच्या शाखा

बाबांच्या विश्वविद्यापीठाचें केंद्र शिरडी आहे असें वर लिहिलें आहे. बाबांचा विद्यार्थी भक्तगण सर्व विश्वांत रत्नाकराच्या असंख्य जलतरंग, आवर्त, बुदबुदाप्रमाणें (लाटा, भोंरे, बुडबुडे) विखुरलेला आहे. व तो जेथें जेथें होता व हल्लींही आहे, तेथें तेथें बाबांनीं त्याच्याकरतां, ठिकठिकाणीं, आपल्या विद्यापीठाच्या शाखा उघडल्या होत्या व हल्लींही उघडल्या आहेत. उदाहरणार्थ—

१. सुमारें २२–२३ वर्षांपूर्वी जी. आय. पीच्या मुंबईहून पुण्यास जातांना लागलागणाऱ्या कर्जत स्टेशन नजीक, भिवपुरी रोड स्टेशनपासून जवळच उकूल गांवीं महाभाग्यशाली श्री. केशव रामचंद्र प्रधान यांना आपली व्हानशी मूर्ति देऊन ती त्यांचे घरीं स्थापन करण्यास सांगून बाबांनीं या विद्यापीठाची एक ल्हानशी शाखा उघडली आहे. ती अद्याप फारशी प्रसिद्धीस आलेली नाहीं. अज्ञातच आहे. श्री. सा. लीला वर्ष १६, जोड अंक ४–५–६ व १०–११–१२ यांत व वर्ष १७ अंक ९ यांत या शाखेची विस्मयजनक व कुतूहलास्पद सविस्तर हकीकत दिली आहे, ती कृपेनें वाचावी.

२. सुमारें सन १९३४ चे पूर्वी (किती वर्षें तें समजत नाहीं.) आंग्लदेशाच्या लंडन राजधानींत निवास करणाऱ्या व 'अज्ञात सामर्थ्य' या नांवाचें (Invisible influence) पुस्तक लिहून प्रसिद्ध करणाऱ्या प्रसिद्ध क्यानन् नांवाच्या डॉक्टराचे घरीं श्रीसाइमाउलीचें एक उत्तम छायाचित्र आहे असें स्वतः डॉ. क्यानन् ह्यांनीं कै. बाबासाहेब तर्खड, त्या वेळीं असलेले श्री साईलीलेचे संपादक ह्यांस कळविल्यावरून श्री. तर्खड यांनीं डॉक्टर साहेबांना "श्री साईबाबा ऑफ शिरडी" या रा. ब. मोरेश्वरराव प्रधान यांनीं इंग्रजींत लिहिलेल्या पुस्तकाच्या २ प्रती पाठविल्या. डॉक्टरसाहेबांना त्यापैकीं एकच प्रत मिळाल्यामुळें त्यांनीं आणखी कांहीं प्रतींची बाबासाहेबांकडे मागणी केली. बाबासाहेबांनीं लागलीच आणखी १० प्रती डॉक्टरसाहेबांना पाठविल्या. Invisible influence पुस्तक लंडन काउंटी कौन्सलला न आवडल्यामुळें काउंटी कौन्सलचा त्यांचेवर राग होऊन त्यांनीं डॉक्टर-

साहेबांस त्यांच्या जागेचा राजीनामा द्यावयास लावला. श्री सद्गुरुमाउलीच्या कृपेनें डॉक्टर साहेबांनीं आपल्या पुस्तकांतील मजकुराच्या सत्यतेबद्दल काउंटी कौन्सलरांची खात्री पटवून दिली व काउंटी कौन्सलनीं डॉक्टरसाहेबांस पुन्हां त्यांचे जागेवर रुजू केलें; इतकेंच नव्हे पण त्यांना आणखी वरिष्ठ प्रकारची जागा दिली. (श्री. सा. लीला वर्ष ११ अंक १ यांत ही सविस्तर हकीकत वाचावी). बाबांच्या विश्वविद्यापीठाची ही समुद्रापलीकडे पांच हजार मैलांबर परदेशांत उघडलेली गुप्त शाखा अद्याप कोणास ज्ञात नाहीं.

३. अलीकडे ४।५ वर्षांपासून बाबांनीं मद्रदेशांत ह्या पीठाच्या शाखा ठिकठिकाणीं उघडल्या आहेत हें सुप्रसिद्धच आहे. तिकडे बाबांचीं अनेक मंदिरें व संस्था नि मठ झाले असून बाबा तिकडील सर्व भक्तजनांना निरनिराळ्या भाषेंत शिक्षणामृत पाजीत आहेत हें आजपर्यंत श्री सा. लीलेंत प्रसिद्ध झालेल्या मद्रबंधुभक्तजनांच्या शेंकडों अनुभवावरून व ते हल्लीं प्रसिद्ध करीत असलेल्या 'साइसुधा' नांवाच्या इंग्रजी मासिकावरून दिसून येईल.

४. ग्वाल्हेर, इंदोर, बडोदें, देवास, जव्हार वगैरे राजधानींत व श्री गया, एडन, क्वेटा, पोर्टब्लेअर, गोकर्ण, महाबळेश्वर, नागपूर वगैरे ठिकाणींहि बाबा आपल्या विद्यापीठाच्या शाखा हळुहळू उघडून तत्द्वासीय भक्तांना शिक्षणाचे पाठ देत आहेत.

ह्या सर्व शाखा मुख्य केंद्रास गुप्तपणें जोडल्या आहेत. मुख्य केंद्राखेरीज इतर शाखांच्या ठिकाणीं मुमुक्षुभक्त विद्यार्थीगणांनीं जरी कितीहि अभ्यास केला तरी त्यांना मुख्य केंद्रांत (शिरडींत) येऊन श्रीसद्गुरू मुख्याध्यापकाच्या दिव्य व पवित्र समाधीचें पुण्य दर्शन घेतल्यावांचून त्यांचें मन तृप्त होत नाहीं व अध्ययनपूर्तीहि होत नाहीं. हा त्या अद्वितीय व अलौकिक केंद्रभूमातेचा स्थानमहिमा आहे. तिचें आकर्षण असेंच विलक्षण ऐंद्रजालिक व लोहचौंबिक आहे. तथापि कोणाची कितीहि तीव्र उत्कंठा असली व तो कितीहि साधनसंपन्न असला तरी त्याला मुख्याध्यापक गुरुमाउलीची आज्ञा वा प्रेरणा झाल्यावांचून त्याला केंद्रस्थानाचें दर्शन घडतच नाहीं.

इतरत्र कितीही शिक्षण मिळालें तरी बाबांच्या समाधि दर्शनांत, बाबांच्या गुरुरायांच्या समाधि दर्शनांत, तेथील परिपूत निंबवृक्ष दर्शनांत, बाबांच्या शयनागार दर्शनांत, तपोवन दर्शनांत व श्री द्वारकामाई दर्शनांत, तेथील एकंदर शांत वातावरण देखाव्यांत, एकान्त निवासांत तेथील नित्य कार्यक्रमाचें सूक्ष्म निरीक्षण करण्यांत, बाबांच्या अतींद्रिय, अमानुष चिद्वैराग्य वैभवाच्या पुण्यस्मरणांत, व जणुं काय आपण क्षणभर बाबांच्या प्रत्यक्ष सान्निध्यांत बसलों असून, बाबा मंदस्मित मुद्रेनें व लडिवाळपणानें आपल्याकडे पहात आहेत, आपल्याजवळ बोलत आहेत, हंसत आहेत, खेळत आहेत, असा भास होऊन अष्टसात्त्विक भाव निर्माण झाल्यामुळें, शुषुप्तावस्थेंतील परमात्मदर्शनलाभजन्य आनंदाप्रमाणें, शांतिसुखाचा अद्वितीय अनुभव घेण्यांत तेथें जें शिक्षण मिळतें तें खरोखर अत्यंत श्रेष्ठ व अवर्णनीय व अनुपमेय असतें.

## १४. विद्यापीठांतील मुख्याध्यापकांची योग्यता, आचरण, शिक्षण वगैरे वगैरे

**योग्यताः**—जीवन्मुक्त, सिद्ध, योगेश्वर, जगदात्मे, पूर्णब्रह्म—

**आचरणः**—कडकडीत वैराग्य.

“ वमिलिया अन्ना । लाळ न घोंटी रसना ॥
आंग न सूये आलिंगना । प्रेताचिये ॥ ५१४ ॥
विष खाणें नागवें । जळत घरीं न रिघवें ॥
व्याघ्रविवरा न वचवे । वस्ती जेवीं ॥ ५१५ ॥
धडाडित लोहरसीं । उडी न घालवे जैसी ॥
न करावे उशी । अजगराची ॥ ५१६ ॥
अर्जुना तेणें पाडें । जयासी विषयवार्ता नावडे ॥
नेदी इंद्रियांचे नि तोंडें । कांहींच जावों ॥ ५१७ ॥
तें हें विषयवैराग्य । आत्मलाभाचें भाग्य ॥
येणें ब्रह्मानंदा योग्य । होती जीव ॥ ५२२ ॥

श्री ज्ञा. अ. १३

**शिक्षण, ज्ञानः**—

तैसी दशेची वाट न पाहतां । वय तेन्हिये गांवा न येतां ॥
बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥ ४५३ ॥
तिये सिद्धप्रज्ञेचे नि लाभें । मनन्चि सारस्वतें दुभे ॥
मग सकल शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥ ४५४ ॥
तैसे दुर्भेद जे अभिप्राय । कां गुरुगम्य हन ठाय ॥
तेथ संसारेवीण जाय । बुद्धी तयाची ॥ ४५९ ॥
तैसे विश्व जेथ होये । मा मौतें जेथ लया जाये ॥
तें विद्यमानेचि देहें । जाहला तो गा ॥ ४७२ ॥
म्हणोनि कर्मनिष्ठा वंद्य । तो ज्ञानियासि वेद्य ॥
तापसांचा आद्य । तपोनाथ ॥ ४७९ ॥

श्री ज्ञा. अ. ६

**वृत्तिः**—नित्यानंदी, गंभीर, विनोदी, स्मितमुखी, शांत पण कधीं कधीं कारणपरत्वें नारसिंहावतारी

**उपजीवनः**—भिक्षेवर.

**वेतन किंवा पगारः**—तीन किंवा चार घरें मागितली जाणारी ओली भिक्षा.

**अहारः**—अत्यल्प—मागून आणिलेल्या भिक्षा भाकरीपैकीं बारीक बारीक दोन किंवा चार तुकडे, लोणचें, मिरची किंवा इतर कोड्यांसाबरोबर दिवसांतून दोन-तीन वेळ व एक वेळ दुधाबरोबर खाणें व पाणी पिणें.

**वेषः**—डोक्यास फडकें, अंगांत कफनी व ढुंगणास लंगोटी, हातांत सटका.
**आसनः**—फाटके पोत्याचें एक पटकुर व कफनी.
**शय्या** ,, ,, ,, ,, ,,
**पांघरुणः**—एक फाटकी बनात.
**उसें**:—फडक्यांत गुंडाळलेली एक पक्की भाजलेली वीट.
**घरः**—लौकिकी घर शिरडींत आल्यापासून श्रीद्वारकामाई (मशीद) पण खरें घर म्हणजे

'हें विश्वचि माझें घर ॥
ऐसी मती जयाची स्थिर ॥
किंबहुना चराचर ॥
आपण जाहला ॥ २१३ ॥
अवघाचि आकाशस्थिती ॥
जैंवि वायूसी नित्य वस्ती ॥
तेवीं जगचि विश्रांति—॥
स्थान जया ॥ २१२ ॥
श्री. ज्ञा. अ. १२

**आवडः**—बगीचा तयार करणें व झाडांस स्वतः डोक्यावर मातीच्या घड्यांत लेंडी नाल्यांतील पाणी आणून घालणें. त्याचप्रमाणें गरीबगुरिबांना दवा सांगणें व मोठी व छोटी हंडी द्वारकामाईतील चुलीवर स्वतः तयार करून सर्वांस वांटणें. पणत्यांत तेल किंवा पाणी घालून रात्रीं दिवे लावणें. कधीं कधीं रहात्यास किंवा निमगांवास जाऊन लागलेच परत येणें. उसांच्या व आंब्यांच्या गाड्या विकत घेणें, बर्फी, पेढे विकत घेणें व सर्वांस वांटणें. चिलीम पिणें, नित्य धुनी प्रज्वलित ठेवणें, तिच्याकरितां लाकडाच्या मोळ्या विकत घेणें, भक्तांचें कल्याण करणें, त्यांना विद्यादान करणें वगैरे वगैरे.

**स्नानः**—नित्यनेमानें रोज नाहीं. जेव्हां लहर लागेल तेव्हां. आठवड्यांतून एक किंवा

**लीला, क्रीडा किंवा खेळ** } "वायू आणि तया पडे ॥
गगनेसी बोलो आवडे ॥
जीवें प्राणें झाडें ॥
पढियंती जया ॥ २०० श्री. ज्ञा. अ. ११

खंड योग—धौति, बस्ती, नेति वगैरे क्रिया करणें, वीतभर रुंद व ४ फूट लांब फळीच्या चार बाजूला चार पणत्या जळत ठेवून, ती कुजक्या तुटक्या चिंध्यानीं वरील पटईला बांधून त्या फळीवर निजणें वगैरे वगैरे.

**मिळकतः**—अंगावरील तीन कपडे, पाणी पिण्याचें टमरेल, मागून आणलेली ओली भिक्षा व ती ठेवण्याची मातीची थाळी, सटका अंथरुण—पांघरुण (पटकूर

व बनात ) चिलीम, पिण्यांचे पाणी ठेवण्याची मातीची घागर व धुनीचीं लांकडें.

## १५ विश्वविद्यापीठांतील शिक्षण वा बोधपद्धति

इतर विद्यालयांत शिक्षण बहुधा बोलण्यानें व लिहिण्यानें दिलें जातें. म्हणजे शिक्षकांचे नेत्र, कान, जिव्हा, हात व पाय हीं पांचच इंद्रियें शिक्षणाचें कार्य करतात; पण बाबांचे विद्यालयांत तसें नाहीं. येथें अध्यापकांचीं पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियें आपापल्या हालचाली, व्यापार व चेष्टा यांच्याद्वारें निरंतर शिक्षणाचेंच काम करीत असत व हल्लींही करतात. या विद्यापीठांत येणाऱ्या बहुत करून प्रत्येक विद्यार्थ्यास अन्वर्थ नामाभिधान देणें, त्यांच्या कोड्यांचा किंवा संकटांचा त्यांनीं न सांगतां उलगडा करून देणें, त्यांनीं विचारलेल्या शंकांचें निरसन करणें, प्रश्नांचीं उत्तरें देणें, चुकांची दुरुस्ती करणें, नाना प्रकारच्या ज्ञानाच्या गोष्टी सांगणें, नानाविध लीला व चमत्कार करणें, भक्तांचा बुद्धिभेद न करतां निरनिराळ्या प्रकारांनीं निरनिराळ्या स्थितींत उपदेश करणें, कासवीप्रमाणें भक्ताकडे नेत्रकटाक्षानें अवलोकन करणें, भक्तांशीं गोड बोलून त्यांची समजूत घालणें, कधीं कधीं त्यांच्यावर अनुरागानें रागावणें, त्यांना गालिप्रदान करणें, त्यांना सटक्यानें किंवा विटांच्या तुकड्यानें मारणें, डोकें धरून त्यांनावर आपटणें, शेळीच्या नऊ लेंड्यांपैकीं एखादी तरी घेणें; अशा सांकेतिक खुणेनें सगुणोपासना करण्यास शिकविणें.

स्वतःचे आचरणानें आत्मसंयमन करण्यास, विकारांवर प्रभुत्व ठेवण्यास, भिक्षा मागून खाण्याची ब्रह्मनिष्ठांची पात्रता अंगीं आणण्यास, वस्तुपरिग्रह न करण्यास, सर्वसंगपरित्याग करून संसारांत राहूनही विरक्त होण्यास, कर्मकर्तृत्वाच्या अहंकाराचें उच्चाटन करण्यास, वेदाज्ञेचें व धर्माचें परिपालन करण्यास, स्वज्ञातीचा, हिंदुत्वाचा, आपल्या आर्यावर्ताचा, आपल्या वाडवडिलांचा, अभिमान बाळगण्यास, वर्णाश्रम धर्माप्रमाणें विहित कर्म करण्यास, परमेश्वराचें अस्तित्व मानण्यास, परमेश्वर, माता, पिता, गुरु, गोमाता, स्वदेशभूमाता, संतसज्जन यांचे ठिकाणीं प्रेम व श्रद्धा ठेवण्यास, श्रीज्ञानेश्वरी, नाथ भागवत, रामायण, भारत, भागवत, भगवद्गीता वगैरे राष्ट्रधर्म ग्रंथ व संतवाङ्मय यांचा सतत अभ्यास, नित्य मनन व निदिध्यासन वगैरे वगैरे करण्यास शिकविणें.

## १६ विश्वविद्यापीठांतील विद्यार्थ्यांना पाठ, आज्ञा, सूचना, ताकिदी, त्यांची परीक्षा व त्यांना शासन

बाबांचे असंख्य विद्यार्थी अनंत ठिकाणीं जगतितलावर विखुरलेले आहेत. कोणास बाबांनीं काय पाठ दिले, काय आज्ञा केल्या याची माहिती मिळणें शक्य नाहीं. तथापि, उदाहरण म्हणून माझ्या माहितीच्या व परिचयांच्या कांहीं भक्तांपैकीं फारच थोड्या भक्तांना बाबांनीं दिलेल्या पाठांचें व आज्ञांचें थोडेसें वर्णन देतों.

१. कै. नानासाहेब चांदोरकर यांस. नाना गीता नित्य वाचावी, पण त्यांतील पहिले अध्यायाच्या पहिल्या श्लोकांतील ' धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे ' ' मामकाः पांडवाश्चैव ' या

शब्दांचे अर्थ बरोबर समजावून घ्यावे. ते नीट समजले नाहींत तर शेंकडों जन्म गीतेचीं शेंकडों पारायणें केलीं तरी व्यर्थ. बाबांनीं स्वतः नानासाहेबांना सर्व गीतेचा व्याकरणासह अर्थ सांगून गीतेचें उत्कृष्ट शिक्षण दिलें.

२ षड्विकारांपैकीं जिंकण्यास अतिसुलभ असा जो मत्सर त्यास प्रथम जिंकण्याचा प्रयत्न करावा.

३ आपण सर्व जगाचे नोकर आहों असें समजावें म्हणजे आपणास कोणावर रुसण्यास जागा रहात नाहीं.

४ मला देण्याला योग्य वस्तु दुसऱ्यास समर्पण करण्याचा प्रसंग आल्यास त्याच्यावर माझा ठाय घालावा व मग ती वस्तु त्यास खुशाल अर्पण करावी. ती वस्तु असा ठाय घातल्यानें मजकडेसच येते.

५ आपल्याजवळ जें असेल त्यांपैकीं कोणी मागावयास आल्यास आपल्या ऐपतीप्रमाणें त्यास द्यावें. जास्त मागेल किंवा त्रास देईल तर न रागावतां त्याची समजूत करून त्यास वाटेस लावावें. त्याला अधिकाराचा अंमल दाखवूं नये.

६ कोणास कोणत्याही कामीं वचनबद्ध झाल्यास तें वचन पुरें करण्याचा प्रयत्न करावा. त्याची भेट घेण्यास टाळूं नये.

७ माझी आठवण नेहमीं व्हावी असें वाटत असल्यास भाजींत ही भाजी बाबांची, फुलांत हें फूल बाबांचें, कपड्यांत हा कपडा बाबांचा, याप्रमाणें मनानें ठरवावें म्हणजे ती ती वस्तु समोर आल्याबरोबर माझीच आठवण होत जाईल.

८ तुझें जें आवडतें दैवत असेल त्याच्या नामाची तूं उपासना करीत जा. पण ती निर्विषय करीत जा. निर्विषय नाम दिवसांतून एक वेळ आलें तरी चालेल, पण बद्द वाजणाऱ्या रुपयासारखी शेंकडों विषययुक्त नामें मुखावाटे रोज आल्यास त्याचा कांहीं उपयोग नाहीं.

९ नाना आतां तूं कांहीं वाचूं नकोस. मी सांगेन तितकेंच कर. दिलेले पाठ बरोबर गिरविले जातात किंवा नाहीं व दिलेल्या आज्ञा पाळल्या जातात किंवा नाहीं, याची परीक्षा बाबा निरनिराळे प्रकारानें घेत, चौकशी करीत व शासनही करीत. कांहीं काल अबोला धरणें हेंच बाबांचें शासन.

१० (श्री. भ. गी. अ. १७ श्लो. २० यावरील श्रीज्ञानेश्वरमाउली यांच्या भाष्याप्रमाणें) बाबांनीं नानासाहेबांस सात्विक दानाचें शिक्षण देऊन त्याचें महत्त्व पटवून दिलें. त्याप्रमाणें नानासाहेबांनीं शि. संस्थानास शिरडींत एक ३-४ शें रु. किंमतीचें घर बक्षिस दिलें.

११ वैश्वदेवाचे शेवटीं कोणतेही जीव आले, (माणूस, श्वापद, पक्षी, कीडमुंगी वगैरे) तरी अतिथीच समजावे. दोन पायांचा माणूस व तोही ब्राह्मणच असला पाहिजे असें नाहीं हें लक्षांत ठेव.

## २. कै. काकासाहेब दीक्षित यांस आज्ञा

१. काका तूं वृंदावनाची (एकनाथी भागवताची) व रामायणाची पोथी वाचीत जा.

२. काका तूं येथें एक वाडा बांध.

### सूचना

३. काका, तो विठपाटील आज आला होता ना तुझ्याकडे ! अरे तो मोठा पळपुट्या आहे. मेख मारून त्याला स्थिर करून ठेव. थोडें दुर्लक्ष झालें तर तो तुझी दृष्टी चुकवून पळ काढील. लक्ष ठेव.

### परीक्षा

४. (एकदां एका एकादशीचे दिवशीं) बाबा म्हणाले, काका हें बकरें काप. गुर्वाज्ञा शिरसावंद्य मानून काकासाहेब हातांत सुरा घेऊन तें बकरें मारण्यास सिद्ध झाले. काकासाहेबांची तयारी पाहून बाबांनीं त्यांना त्या कृत्यापासून परावृत्त केलें.

### सात्विक दान शिक्षण

५. सात्विक दान शिक्षणाप्रमाणें, शिरडी संस्थानास काकासाहेबांनीं एक ४-५ शें रुपये किंमतीची खुली जागा शिरडीस विकत घेऊन बक्षिस दिली आहे.

## ३. कै. बापूसाहेब जोग यांस

१. श्री नाथ भागवत व श्री ज्ञानेश्वरी हे ग्रंथ वाचीत जाण्यास बाबांनीं बापूसाहेब जोगांना आज्ञा केली.

२. मला नैवेद्याला रोज दोन शेरांचा शिरा आणीत जा.

३. तुझ्या पूर्वसेवार्थ मासिक वेतनापैकीं मला निम्मे पेनशन (रु. ५०) देत जा.

४. तुझ्याजवळ जें असेल तेंच बापूसाहेब बुटीला जेवावयास घालीत जा. त्याप्रमाणें बापूसाहेब जोगांनीं बापूसाहेब बुटींना एक वर्षभर दररोज दोन्ही वेळां जेऊं घातलें. यांत बाबांनीं उभयतांनाही अति उच्च प्रतीचें शिक्षण दिलें आहे, हें स्पष्टच आहे.

## ४ कै. माधवराव देशपांडे यांस

१ शाम्या ही विष्णुसहस्रनामाची पोथी घे तुला व ही दररोज वाचीत जा.

२. शाम्या हा (श्रीरामसीता व लक्ष्मण यांचीं चित्रें असलेला) रुपया तुला घे. शाम्या ह्या पादुका (चांदीच्या लहान) व हा शालिग्राम तुला घे.

३. शाम्या माझें घर बांध (लाकडाचा देव्हारा तयार करून घे.) त्यांत वरील रुपया, पादुका व देव ठेव व त्यांची पूजा करीत जा.

४. शाम्या आल्यागेल्याकडे नजर ठेवीत जा व त्यांना जेऊं घालीत जा.

## ५ श्री दासगणू महाराज यांस

१ माझे काका, मामा, ठिकठिकाणीं आहेत त्यांना बोलावून आण. नाना बिछायत घालील.

२ श्री. ईशावास्योपनिषदाचा अर्थ लोकांना सांग. त्यांत शंका आली ती त्यांनीं बाबांना विचारली. काकाची ( कै. हरी सीताराम दीक्षित ) मोलकरीण सांगेल. पाल्यास जाशील तेव्हां तिला विचार असें बाबांनीं त्यांना सांगितलें. त्याप्रमाणें त्या मोलकरणीकडूनच शंकानिवृत्ति झाली. कोट्याधीश बापूसाहेब बुटींना जसें महिना ५० रु. पेनशन मिळणाऱ्या बापूसाहेब जोगांकडे वर्षभर जेवण्यास बाबांनीं सांगितलें तद्वतच वरील शंका-निवृत्तीची गोष्ट आहे. विद्या व द्रव्य यांचे अहंकारापासून परावृत्त करण्याचें हें एक अप्रतीम शिक्षण आहे.

## ६ श्री. लक्ष्मण गणेश तथा काका महाजनी यांस

काका हें घे तुझें पुस्तक. ( नाथ भागवत ) ह्याला नीट जीव लाव. हेंच आपल्या कामास येईल. रोज वाचीत जा. तें आपल्या जिवाभावाला उपयोगी येईल. हें कोणास देऊं नकोस. अशी आज्ञा बाबांनीं काका महाजनींना केली. हल्लीं श्री. र. भा. पुरंदरे जीं कामें करीत आहेत व पूर्वी त्यांनीं केलीं त्यापैकीं कांहीं बाबांच्या प्रेरक शिक्षणामुळें केलीं आहेत.

## ७ कै. आण्णासाहेब दाभोळकर यांस

१. माझें चरित्र लिही. माझी पूर्ण अनुमती आहे. मनांत शंका घेऊं नको. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेव. मनाचा निर्धार कर.

२. मला दिल्यावांचून कांहीं खात जाऊं नकोस.

३. माझा उपदेश इतराप्रमाणें नाहीं. फक्त कासवीप्रमाणें मी आपल्या पोरांकडे अवलोकन करतों.

४. आण्णासाहेबांना हेमाड हें अन्वर्थ नांव देऊन शि. संस्थानचें कोषाध्यक्षाचें काम करण्यास त्यांना प्रेरणा ( आज्ञा ) केली.

## ८ एका स्नेही भक्तास

१. आसन कसें घालावें, हाताचीं बोटें कोठकोठें कसकशीं ठेवावींत हें स्वप्नांत सांगून बाबांनीं त्यास नाममंत्राचा उपदेश केला.

२. श्री ज्ञानेश्वरी नित्य वाचण्याची आज्ञा मला द्वारकामाईत केली.

३. नाममंत्र कसा म्हणावा हें स्वतः स्वप्नांत सांगून श्री. नानासाहेब चांदोरकर यांचेकडून जागृतावस्थेंत त्याचें स्पष्टीकरण करून दिलें.

४. दोन वर्षांनंतर ज्ञानेश्वरी समजते कां म्हणून स्वप्नांत चौकशी करून चुकीची दुरुस्ती करून दिली.

५. 'बाबांस चार दिले म्हणजे एक पोंचतें.' मला जितकें देशील तितकीच तुझी जमा.' 'जें विचारावयाचें असेल तें मला विचारावें, दुसऱ्यास विचारूं नये.' 'जो कोणी जें सांगेल त्यांवर भरवसा ठेवूं नये.' हे व अशाच प्रकारचे आणखी पाठ बाबांनीं त्यास दिले.

६. एकदां एका पाठांत चूक झाल्यामुळें बाबांनीं नारसिंह अवतार घेऊन त्यास खूप शिव्या दिल्या. सटक्यानें मारण्याचा आंव आणला. लाल झाले. रागावले. त्यास दोन वेळां श्रीद्वारकामाईतून हाकून दिले. नंतर थोड्या वेळानें त्याचेकडून दक्षिणा घेऊन, त्याचे मनांतील हेतु त्यास सांगून वरील परिछेद २ यांत लिहिल्याप्रमाणें आज्ञा केली.

## ९ कै. श्रीमंत बापूसाहेब बुटी यांस

१. बापूसाहेबा, तूं बापूसाब जोगांकडे जेवीत जा, अशी आज्ञा केली. त्याप्रमाणें ते त्यांचेकडे दोन्ही वेळ वर्षभर जेवीत असत.

२. बाबांचें समाधिमंदिर बांधण्यास आज्ञा केली व त्यांच्याकडून उत्तम प्रकारचें सात्विक दान करून घेतलें.

३. बापूसाहेबांना अतिनम्रपणानें वागण्याचें शिक्षण व अक्षरशः गुर्वाज्ञा पाळण्याचें शिक्षण देऊन त्यांची संसारप्रवृत्ति निवृत्ती मार्गाकडे वळविली. बापूसाहेब बहुतेक विरक्तच बनले होते.

## १० श्री. उपासनी महाराज यांस

शिरडींतील श्रीखंडेरायाचे मंदिरांत त्यांनीं जाऊन रहावे अशी बाबांनीं त्यांना आज्ञा केली.

## ११ कै. राधाकृष्ण आई यांस

१. श्री राधाकृष्ण आईना फक्त श्रीद्वारकामाईचे जोत्यापर्यंतच येण्याची, जोत्यावर न चढण्याची व बाबा दुपारीं जी भाकरी व भाजी देतील तितकेंच खाऊन राहण्याची आज्ञा होती.

२. श्रीगोपालकृष्णमूर्ति चोवीस तास जवळ बाळगण्याची, लेंडी नाल्यावर जाण्याचा बाबांचा रस्ता झाडून साफ करण्याची व बाबांचे स्थानास संस्थानचें स्वरूप देण्याची बाबानींच त्यांना प्रेरणा केली. बालपणापासूनच संतसेवेचें व पूर्ण वैराग्याचें बाबांनीं त्यांना शिक्षण दिलें होतें असें त्यांच्या तेथील वर्तनावरून दिसत असे.

## १२ कै. बाळकराम मानकर यांस

१. नागपूर जवळील रामटेकचे टेकडीवर जाऊन राहण्याची आज्ञा बाबांनीं त्यांना दिली. त्याप्रमाणें तेथें वर्षभर राहून परत शिरडीला आले.

२. शिरडींत आल्यावर बाबांनीं त्यांना कांहीं पाठ दिले पण त्याची माहिती बाबांनीं मला बाळकरामांना विचारूं दिली नाहीं. त्यांना रात्रींची झोंप नसे. ते जागेच

असत असें त्यांनीं मला स्वतः काकासाहेब दीक्षितांचे वाड्यांत माडीवर सांगितलें. त्यांना बाबांनीं पूर्ण वैराग्याचें शिक्षण दिलें होतें असें त्यांच्या वर्तनावरून दिसे.

## १३ श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे यांस शिक्षण, पाठ, आज्ञा व उपदेश

१. श्री. पुरंदरे हे रेल्वे खात्यांतील नोकर. त्यांना इतर कामाची माहिती कोठून असणार ? पण बाबाच त्यांना नानाप्रकारच्या कामाची प्रेरणाकरून स्वतः शिक्षण देऊन त्यांच्याकडून शि. संस्थानच्या खासगी स्वरूपाचीं कामें करून घेत असत.

२. श्रीद्वारकामाईतील दुरुस्ती, बाबांच्या लेंडीवर जाण्याच्या रस्त्यावर सुंदर लोखंडी उंच कमानींची उभारणी, त्यावर मनोहर पुष्पगुच्छान्वित वेलींचा मंडप वगैरे वगैरे.

३. काम नीट झालें नाहीं तर बाबा तें उपटून टाकीत. त्यांना शिव्या देत, मारीत व गोड बोलून पुन्हा चांगलें करून घेत.

४. हल्लींच्या चावडीचें काम स्वप्नांत त्यांचे मागें लागून बाबांनीं त्यांचेकडून करून घेतलें. तसेंच रथ, पालखी, घोडा, खोगीर, घोड्याचे अंगावरील व खोगरावरील दागिनें; चांदीचा चौरंग प्रभावळ, छत्री, ध्वजापताका, मोरचेले, गरुडटके, भालदार चोपदारांच्या चांदीच्या काठ्या, चांदीचा तांब्या, ताट, वाट्या, घंटा आदिकरून व इतर पुष्कळशीं कामें बाबांनीं त्यांचेकडून करून घेत व हल्लीं ही करून घेतात.

५. आपलें काम आपणच करावें, लोकावर टाकूं नये. इकडची नेहमीं याद ठेवावी.

६. कोणी आपल्या अंगावर ××× (घाणीच्या) शंभर पाट्या टाकल्या तर त्याचे अंगावर आपण तशी उलट टाकूं नयेत. वाटेल तर एखादा शब्द बोलावा व तेथून निघून जावें.

७. अवघ्याकडे ध्यान देत जा.

८. अवघ्यांना जेऊं घालीत जा व मग जेवीत जा.

९. आतां हें काम असेंच राहूं दे. मग तें आपण चांगलें करून घेऊं बरं कां.

१०. एखाद दुसरें दिवशीं येथें येत जावें. समाधीवर ध्यान ठेवावें. आपल्या येथें कोणी आंधळा बि येतो, पांगळा बि येतो, भला बि येतो, बुरा बि येतो, आई येते बाई येते, पोर येत सोर येत त्यांच्याकडे ध्यान ठेवावें.

## १४ कै. अण्णा चिंचणकर यांस

१. बाबांनीं अण्णांना श्रीमद्भगवद्गीतेंतील (अ. १७ श्लो. २० या वरील ज्ञानेश्वर भाष्य) सात्विक दानाचें शिक्षण देऊन त्यांना तशी प्रेरणा करून; त्यांचेकडून श्री. काका साहेब दीक्षित वगैरे भक्तांच्या सहाय्यानें त्यांची सर्व स्थावर जंगम मिळकत किंमत अजमासे पंधरावीस हजारांची शिरडी संस्थानास कायमची बक्षीस म्हणून करून देवविली.

२. असें करण्यांत बाबांनीं अण्णांना सात्विक दानास देश, काल व पात्र कसें असावें याबद्दल अत्युच्च शिक्षण तर दिलेंच व त्यांचेकडून प्रत्यक्ष कृतिही करून घेतली; पण निर्वंश झाला असतां वंशांत चैतन्य उत्पन्न करून आचंद्रदिवाकरौ तो जिवंत कसा

ठेवावा व आपलें पारमार्थिक श्रेय कसें साधावें हें त्यांना शिकवून जगासही अनुपमेय धडा घालून दिला आहे.

३. बाबांच्या शिक्षणानें अण्णांची व त्यांचें कुटुंब सौ. लक्ष्मीबाई या उभयतांची चित्तवृत्ति बाबामय बनली होती.

४. त्यांचें चरित्र व फोटो शिरडी संस्थानांत निर्वेशपुनरुज्जीवन शिक्षणादर्श म्हणून अवश्य पाहिजेत.

## १५ कै. बाळासाहेब माटे

१. श्री. नानासाहेब चांदोरकरांच्या स्नेहामुळें व सहवासामुळें बाळासाहेब शिरडीस बाबांचे दर्शनास आलें. त्यापूर्वी इतर साधुसंतांचें दर्शनामुळें व त्यांचे गुणानुवाद व यशकीर्तनश्रवणामुळें त्यांचे मनावर ऐन तारुण्यांतच परमार्थाची छाप पडली होती. बाबांचे दर्शनानें ती दृढावली व अतःशिक्षणानें त्यांचें चित्त वैराग्याकडे झुकूं लागलें.

२. इतर संतापेक्षां बाबांच्या दर्शनाकर्षणानें त्यांचें मन इतकें मोहित झालें कीं, कांहीं दिवसांनीं त्यांनीं आपल्या मामलतदारीच्या नोकरीवर लाथ मारून पूर्ण विरक्त बनून ते आमरण शिरडीस बाबांचे चरणाजवळ येऊन राहिले.

## १६ श्री. अबदुलभाई

बाबांच्या अंतःशिक्षणानें अबदुलभाई हे विरक्त बनले आहेत. बाबांनीं त्यांना कुराणाचें शिक्षण दिलें. बाबा स्वतः त्यांना कुराणग्रंथ समजावून देत.

## १७ श्री. म्हाळसापती

बाबांच्या शिक्षणानें म्हाळसापती यांची पहिली वित्तैषणा कमी होऊन त्यांचे ठिकाणीं नैराश्य बाणलें होतें. बाबा त्यांना बिलकूल दिडकी घेऊंच देत नसत.

## १८ श्री. सगुण मेरु नाईक

१. बाबांनीं यांना बागबगीचे तयार कसे करावे याचें शिक्षण देऊन त्यांचेकडून शिरडी संस्थानची बाग तयार करून घेण्यांत आली.

२. आपल्यास रोज सकाळची न्याहारी आणीत जावी म्हणून बाबांनीं यांना स्वप्नांत आज्ञा केली. नंतर जाग्रतावस्थेंत न्याहारींत काय पदार्थ असावे हें समक्ष सांगितलें.

३. नंतर कांहीं कालांनीं न्याहारी देण्यापूर्वी प्रथम तूप घालून त्यांतील दोन घास बाबांच्या धुनींत टाकावे असें सांगून स्वतः प्रत्यक्ष कृति करून दाखविली. तुपाखेरीज भात आणूं नये अशी आज्ञा केली.

४. म्हणजे रोज प्रथम वैश्वदेव करून नंतर परमात्म बाबास नैवेद्य देत जावा अशी धार्मिक शिकवणूक दिली.

५. गरीबगुरिबांवर दया करणें, जनावरांवर प्रेम करणें हें शिक्षण बाबांनीं सगुणरावांस दिलें.

## १९ श्री बी. व्ही. नरसिंहस्वामी

बाबांनीं स्वामीजींना अलीकडे ५।६ वर्षांत अंतःप्रेरणेनें वानप्रस्थाश्रमाचें व संन्यासाश्रमाचें व प्रचार कार्याचें शिक्षण देऊन त्यांना विरक्त बनवून बाबा त्यांचेकडून भक्तजनांना आलेल्या अनुभवाचीं इंग्रजींत पुस्तकें लिहून घेऊन त्या इंग्रजी पुस्तकांचीं हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या मुख्य मुख्य भाषेंत भाषांतरें करवून घेऊन, तीं छापवून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करून व स्वतः इंग्रजींत व त्यांना ज्ञात असलेल्या मद्रप्रांतीय भाषेंत सर्व हिंदुस्थानभर व्याख्यानें देऊन, विलक्षण प्रचारकार्य करवून घेत आहेत. हे अत्यंत हुषार असून नामांकित बी. ए. बी. एल् आहेत. ते पूर्वीं एम्. एल. सी. होते. यांचें प्रचारकार्य उत्साह व बाबाभक्ति अति दांडगी, अपूर्व व लोकोत्तर आहे. त्यांचें वय ६७ वर्षांचें आहे, पण त्यांची तरतरी विलक्षण आहे. ते बाबामय झाले आहेत.

## श्री शिरडी संस्थान सभा विश्वस्त कार्यवाह व सभासद

१ शिरडी संस्थान सभेंत संस्थानचें विनामूल्य व पदरची झीज सोसून, काम करण्यास प्रथम व नंतर वेळोवेळीं असंख्य भक्तसमूहापैकीं कोणी कोणी यावें.

२ सभेंत किंवा सभेचे बाहेर राहून संस्थानचें कोणी कोणी काय काय काम करावें,

३ याची योजना व निवड स्वतः अशरीरी व अदृश्य बाबाच करतात.

४ त्या त्या भक्तांना ते तसतशी प्रेरणा करतात. त्याकार्यासाठी लागणारी बुद्धिमत्ता, उत्सुकता, तरतरी, त्यांना देतात. त्यांचे ठिकाणी 'आपलेबद्दल' (बाबाबद्दल) अत्यंत आवड व प्रेम उत्पन्न करतात.

५ सभेंत सदस्य झाल्यावर त्या सदस्यांना त्या त्या कामाला उपयुक्त असें शिक्षण देतात.

६ विनामूल्य सभासदांकडून व वेतनी संस्थान सेवकांकडून संस्थानची बव्हंशी वेळचे वेळीं कामें करून घेतात.

७ सर्वांना निरहंकारवृत्तीनें, कर्तव्यबुद्धीनें व परमानंदानें आपापलें काम करण्याचा पाठ देतात व त्यावर देखरेखही तेच ठेवतात.

८ काम, भक्तिभाव, प्रसन्नता व उत्साहपूर्वक, तसेंच खिन्नता, उद्विग्नता व विषण्णता, रहित व प्रमुदित अंतःकरणानें झाल्यास बक्षिस देतात. चूक झाल्यास किंवा कंटाळा केल्यास शासन करतात. बक्षिस (गुरुकृपा) अदृश्य असते. शासन दृश्य असतें पण तें त्या भक्ताच्या प्रेयाकरतां व श्रेयाकरतां असतें.

आणखी असंख्य भक्तांस बाबांनीं कोणकोणतें कोठकोठे व कसकसे पाठ किंवा शिक्षण दिलें त्याची मला माहिती नसल्यामुळें हा विषय येथेंच पुरा करतों.

## १७ विद्यापीठांतील शिस्त

ज्याला जें काम नेमून दिलें असेल तें त्यानेंच बिनतक्रार व वक्तशीर केलें पाहिजे. एकाचें काम दुसऱ्यानें करतां कामा नये, अशी या विद्यापीठांतील शिस्त होती व ती बाबा ह्यात असेपर्यंत अव्याहत चालू होती. त्यांत केव्हांही खंड पडत नसे.

## १८ श्रीसद्गुरु आचार्याध्यापकांच्या मुखांतील योग्यता व मोल

या पीठांतील अध्यापक वेतन घेऊन शिकविणारे शिक्षकासारखे नव्हते व नाहींत हें पूर्वी लिहिलेंच आहे. त्यांच्या मुखांतील अक्षराची योग्यता व किंमत अमोल आहे. त्यांच्या मुखांतून निघालेल्या प्रत्येक ऱ्हस्व, दीर्घ, काना, मात्रा, अनुस्वार, विसर्ग, पादपूरणार्थ योजलेले शब्द या सर्वांस अर्थ व किंमत असते; त्यांत टाकीव, गाळीव, फुकट, व्यर्थ असें कांहींच नसतें.

त्यांच्या मुखांतून निघालेल्या शब्दांत विद्युत् शक्तीप्रमाणें विलक्षण सामर्थ्य असतें. मोठमोठ्या मुनींचा, ऋषींचा, योग्यांचा, साधकांचा अज्ञानांधःकार नाहींसा करून त्यांचा संस्कृतिव्यामोह पूर्ण नष्ट करण्याची त्यांच्या उपदेशशब्दांत किंवा दिव्य दीक्षाक्षरांत अचाट व अलौकिक शक्ति असते.

" मुनि र्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततयाः

श्रीशंकराचार्यकृत आनंदलहरी. १ ते १६ श्लो.

गुरुमुखांतील अक्षर दिसण्यांत लहान असलें तरी तें परिणामीं अत्यंत थोर असतें. विश्वांतील सर्व शास्त्रांतील पारंगतता त्या अक्षराची बरोबरी करूं शकत नाहीं. स्वर्गीय सुरांना सुद्धां गुरुमुखीचें अक्षर दुर्मिळ असतें. त्याचा प्रभाव अगम्य व अतर्क्य असतो.

आंगें सानें परिणामें थोर । जैसें गुरुमुखींचें अक्षर ॥
तैसा अल्पीं जिहीं अपार । तृप्ती राहे ॥ १२९ ॥

श्री. ज्ञा. अ. १७

श्री गुरुमुखांतील अक्षर किंवा वचन हा एक अद्वितीय व अलभ्य अद्वैत संपत्तीचा ठेवा आहे असें समजून जो विद्यार्थी भक्त, त्याकडे पूर्ण लक्ष देऊन तो उत्तम प्रकारें जतन करून ठेवील तो शिष्य खात्रीनें आत्मभुवनाप्रत पोंचेल.

" नातरी श्रीगुरुवचना । दिठी हेतु जनता ॥
शिष्य आत्मभुवना– । माजि पैसे ॥ ४५७ ॥

श्री ज्ञा. अ. १६

(तसेंच अ. १६ ओं. २१९ पहाव्या. उपदेश मंत्र कोणास सांगू नये. व तसेंच अ. १५ ओं. २४ गुरुकृपेचें फल.)

## १९ बाबांच्या विद्यापीठांतील ' हें विश्वचि माझें घर ' या अत्यंत महनीय तत्त्वाची प्रत्यक्ष शिकवणूक

१. बाबाचें विद्यापीठ वेतनी शिक्षकांचें नसून विनामूल्य शिक्षकांनीं रात्रंदिवस चालू ठेवलें होतें व ठेवलें आहे, असें वर लिहिलेंच आहे. बाबा श्रीद्वारकामाईचे प्रांगणांत कधीं कधीं छोटी व मोठी हंडी स्वतः तयार करीत. निरनिराळे प्रकारची हंडी बनवीत. स्वतः बाजारांत जाऊन, योग्य किंमत देऊन, हंडीस लागणारे नानाविध पदार्थ खरेदी करीत. नंतर श्रीद्वारकामाईत येऊन स्वतः चूल पेटवून तीवर त्या पदार्थांची दे

हंडी बनवीत व हंडी थंडी झाली म्हणजे जातपात, गोत, लहान मोठा न पहातां जी मंडळी जमली असतील त्यांना ती खाऊ घालीत.

२. यानंतर श्रीद्वारकामाईचे जोत्यावरील अल्लामियाच्या मोठ्या कोनाड्यानजीक असलेल्या निंबराजवळ बसून दुपारीं आलेले नैवेद्य एकत्र करून ज्यांची इच्छा असेल त्या विवक्षित सर्वांस मंडळींना वाटून देऊन दररोज बाबा त्यांना जेवावयास घालीत.

३. बाबांच्याच आज्ञेनें, श्री राधाकृष्ण आईचें खोलींत जतन करून ठेवलेल्या पुष्कळ दिवसांच्या शिळ्या राहिलेल्या उच्छिष्ट भाकरीच्या तुकड्यांत बाबांच्या त्या दिवसाच्या शिळ्या व उष्ट्या भाकरीचे तुकडे मिसळून त्यावर फोडणी देऊन तोही प्रसाद सर्वांस वाटण्यांत येत असे.

४. बाबांना भक्तांनीं अर्पण केलेली नानाविध फळफळावळ, नारळ व मिठाई बाबा दररोज श्री द्वारकामाईत जमलेल्या सर्व लहानथोर मंडळींस वाटून देत.

५. मोसमचे दिवसांत गाड्याच्या गाड्या ऊंस व आंबे बाबा स्वतः खरेदी करून, तसेंच बर्फी व इतर मेवामिठाई विकत घेऊन सर्वांना वाटीत. स्पर्श करण्यापलिकडे या सर्व वस्तूपैकीं बाबा कोणत्याहि पदार्थाचें केव्हांहि ग्रहण करीत नसत.

६. बाबांचे दर्शनास विश्वांतील शेंकडों ठिकाणाहून शेंकडो मंडळी नित्य येत व बाबा सर्वांना सारखेच वागवीत.

७. कोणी हापूसचे आंबे आणीत तर ते, बाबा स्वतः हातानें बिलबिले करून ' घे, खाय खाय ' म्हणून तेथें जवळ असलेल्या मंडळींना आग्रह करून खावयास देत. तसेंच बाबांच्या हातावर कोणी जोंधळ्याचा ताजा ऊन ऊन हुरडा ठेविला किंवा बाजरीचा निंबोर किंवा गव्हाच्या ओंब्या ठेवल्या तर त्यापैकीं आपण कांहींएक न खातां जवळच्या मंडळीस वाटून देत.

८. बाबा त्यांच्याजवळ आलेले दक्षिणेचे पैसे मग ते कितीहि असोत, सायंकाळ-पर्यंत सर्वांना वाटून खलास करीत. आपल्याजवळ एक दिडकीहि ठेवीत नसत. तसेंच आलेल्या कफण्यापैकीं एकहि आपल्याकरितां न ठेवितां मागावयास आलेल्या माणसांना त्या देऊन टाकीत.

९. खालपासून वरपर्यंत हल्लींच्या विद्यालयांत जें अपुरें व स्वार्थी शिक्षण मिळतें त्याऐवजीं बाबांच्या या विद्यापीठांत त्यांच्या स्वतःच्या कडकडीत वैराग्यशील व अपरिग्रही आचरणानें ' वसुधैव कुटुंबकं ' किंवा ' हें विश्वचि माझें घर ' या अत्युच्च महनीय तत्त्वाचें पुरें व निस्वार्थी शिक्षण सर्वांना मिळत असे व मिळतें.

## २. विश्वविद्यापीठांतील वार्षिक संमेलनें व समारंभ

हल्लीं बहुतेक सर्व मोठमोठ्या शाळांतून व कॉलेजांतून वर्षांतून निदान एक दिवस तरी, विद्यार्थी व शिक्षक यांचें संमेलन ( Gathering ) करण्याची प्रथा सर्वत्र पडली आहे. संमेलन म्हणजे त्या त्या ( शाळांतून किंवा कॉलेजांतून ) विद्यालयांतून किंवा विद्यापीठांतून शिक्षण घेऊन पसार झालेल्या व घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा

त्या विद्यालयांत किंवा विद्यापीठांत सर्वांच्या सोईप्रमाणें मुक्रर केलेल्या नियमित दिवशीं समागम होऊन एकमेकांच्या प्रेमगांठीभेटी व नव्या ओळखी होणें, एक ठिकाणीं बसणें, बोलणें, खाणें, पिणें, फिरणें, प्रवचन, व्याख्यान, कीर्तन, गायन, क्रीडन, हास्य, थट्टा, मस्करी, विनोद, नाटक, चित्रपट दर्शन, शयन वगैरे वगैरे मोकळ्या मनानें करमणूक व आनंदी आनंद करणें व जगाच्या सार्वजनिक व्यवहार ज्ञानाचें शिक्षण मिळवणें व एकमेकांच्या अनुभवजन्य ज्ञानाची त्यांत भर घालून आपले ज्ञानाची वृद्धि करणें व आपापल्या ठिकाणीं आपापले उद्योगास परत जाणें.

बाबांच्या विश्वविद्यापीठांत ही मुख्य केंद्राचे ठिकाणीं वर्षांतून उत्सव स्वरूपांत ठरलेल्या दिवशीं चार वेळां जुन्या नव्या भक्तांचें संमेलन भरतें. हीं संमेलनें एक दिवसांची, तीन दिवसांची, चार दिवसांची, पांच दिवसांची असतात. त्यांतही वरीलप्रमाणें सर्व कार्यक्रम असतातच. शिवाय पालखी, रथ, गारुड व गुरुवार वगैरे वगैरे अन्य समारंभ असतात. यांतही एकमेकांच्या पारमार्थिक ज्ञानाचा एकमेकांस लाभ मिळतो व केंद्रांतील बाबांच्या पांच पुण्य स्थानांचे दर्शनाचा लाभ मिळून भगवान ज्ञानेश्वर माउलीनीं वर्णन केल्याप्रमाणें गुरुभक्ती कशी करावी व आपलें कल्याण कसें करून घ्यावें याचें येथील संमेलनांत अत्युत्कृष्ट शिक्षण मिळतें. सद्‌गुरु ही अनर्घ्य, अमोल, अपूर्व, असामान्य, दुर्लभ वस्तु आहे. केवळ काया, वाचा, मनें करून तिची नमनपूर्वक भक्ति करणें व आपलें इष्ट साध्य करून घेणें असें नाहीं. तर श्रीविष्णूनीं ( श्रीपंढरीराय विठ्ठलांनीं ) आपले गुरु श्रीशंकर यांना ज्याप्रमाणें मस्तकावर धारण करून ठेविलें आहे त्याप्रमाणें आपण बाबांना सदैव डोक्यावर धारण करून नाचत राहिलें पाहिजे.

श्रीज्ञानेश्वर माउली लिहितात.

'उत्तमासी मस्तक । खालविजे हें काय कौतिक ॥
परी मान करिती तिन्ही लोक । पायवणिया ॥ २१५ ॥
तरी श्रद्धा वस्तूसी आदरू । करिता जाणिजे प्रकारू ॥
जरी होय श्रीगुरु । सदाशिव ॥ २१६ ॥

श्री. ज्ञा. अ. १२

श्रीराधाकृष्ण आई श्रीराधाकृष्ण मूर्ति निरंतर चोवीस तास आपले जवळ बाळगीत. शौचास जातांनासुद्धां बरोबर नेत. हा त्यांचा श्रद्धावस्तूचा आदर वरप्रमाणेंच नव्हे कां ? हे शिक्षण त्यांनीं बाबांच्या विश्वविद्यापीठांतच घेतलें.

हें अत्युच्च शिक्षण व्यावहारिक संमेलनांत मिळत नाहीं. बाबांच्या विश्वविद्यापीठांतील उत्सव संमेलनांतच मिळतें.

## २१ विश्वविद्यापीठांतील श्रमभोजन

प्रत्येक यज्ञसमारंभांत ज्याप्रमाणें पूर्णाहूति झाल्यावर यज्ञपरिपूर्ति म्हणून हुतशेष म्हणजे पुरोडाश घेण्याची पद्धत आहे. त्याप्रमाणें प्रत्येक उत्सवांत, संमेलनांत व शुभ-

समारंभांत शेवटीं त्या कार्याची परिपूर्ति म्हणून दमल्या थकल्या मंडळीकरतां काला किंवा श्रमभोजन करण्याची पद्धति आहे.

१. बाबा आपले विश्वविद्यापीठांत, स्वतः तीन प्रकारचा काला करून तो भक्तगणांना खाऊ घालून त्या रूपानें जसें व्यवहारिक श्रमभोजनाचें शिक्षण देत, तसेंच ते,

२. श्री भगवद्गीतेंत व श्रीप्रश्नोपनिषद्रांत सांगितल्याप्रमाणें संसार अटवीत भटकून भटकून थकलेल्या मुमुक्षु जिवानें पारमार्थिक काला कसा करावा व पारमार्थिक श्रमभोजन करून नित्यानंदाचलाचें शिखर कसें गाठावें याचेंहि अद्वितीय व अतर्क्य शिक्षण देत असत व हल्लींहि देतात.

## १ श्री भ. गीतेंतील काला व श्रमभोजन

" महाभूतान्यहंकारे । बुद्धिरव्यक्तमेव च ॥
इंद्रियाणि दशैकंच । पंच चेंद्रियगोचराः ॥ ५ ॥
इच्छा द्वेषः सुखं दुःखं । संघातश्चेतना धृतिः ॥
इति क्षेत्रं समासेन । सविकारमुदाहृतम् ॥ ६ ॥

श्री. ज्ञा. अ. १३

" छत्तिसा सदतिसावें । चोविसा पंचविसावें ॥
तिन्ही नुरोनि स्वभावें । चतुर्थ जें ॥ २५ ॥

श्री. ज्ञा. अ. १४

पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, अहंकार, बुद्धि, प्रकृति, पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, मन, दश इंद्रियांचे दहा विषय, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, समुदाय, चेतना व धृति हे ३६ विकार व सत्व, रज, तम हे तीन गुण (गीताकारांचे मताप्रमाणें) किंवा २४ विकार (सांख्यांचे मताप्रमाणें) याचे (या विकाररूपी लाह्यांचें) श्रीगुरुरायांचे पुण्यचरणरूपी पात्रांमध्यें आपल्या, त्यांचे ठिकाणीं असलेल्या प्रेमरूपी गोरसांत (हृदयांत) संमिश्रण करणें हा या विश्वविद्यापीठांतील पहिला पारमार्थिक काला होय, व ३७ वें किंवा २५ वें साईपुरुषीं समरस होणें (संसारांतून सुटून आत्मतृप्त होणें) हें या पीठांतील श्रमपरिहार भोजन होय.

525

## २ श्रीप्रश्नोपनिषदांतील काला व श्रमभोजन

" स प्राणानसृजत प्राणाच्छ्रद्धां खं वायुर्ज्योतिरापः पृथिवींद्रियं मनः । अन्नमन्नाद्वीर्यं तपो मंत्राः कर्म लोका लोषुच नामच ॥ ४ ॥

प्रश्न ६ वा, मंत्र ४ था

प्राण, श्रद्धा, आकाश, वायु, तेज, पाणी, पृथ्वी, इंद्रियें, मन, अन्न, वीर्य, तप, मंत्र, कर्म, निरनिराळीं भुवनें व त्यांतील नामें याप्रमाणें प्रत्येक मानवी जीव जन्मतः आपल्याबरोबर षोडश कलात्मक देह घेऊन येतो व संसारांत पडतो. बाबा भक्तांना दोन भिंवयाच्या मध्यें ते आपल्या उजवे हाताच्या अंगठयानें दाबून उदी लावण्यानें जी १७ वे चंद्रामृत कलेची खूण दाखवीत, त्या

१७ वे कलेंत वरील १६ कलांचें संमिश्रण करणें, म्हणजे योगसामर्थ्यानें लय करणें हा या विश्वविद्यापीठांतील दुसरा पारमार्थिक काला होय. लय पावण्यानें बाबांशीं मूर्घ्नि आकाशांत ( मस्तकाकाशांत ) अनन्य किंवा समरस होऊन रहाणें म्हणजे संसारयेरझारांतून सुटून सायुज्य मुक्तीचा लाभ घेऊन आत्मतृप्तीचे ढेंकर देणें हें या विश्व-विद्यापीठांतील दुसरें पारमार्थिक श्रमपरिहार भोजन होय. इतर विद्यालयांत किंवा विद्या-पीठांत कधींही चाखावयास न मिळणारे पारमार्थिक काल्याचें व श्रमपरिहार भोजनाचें स्पृहणीय, अतर्क्य, नित्यानंद सुख, शांतिकारक शिक्षण बाबा, ह्याप्रमाणें मुमुक्षु भक्तजनांना अधिकारपरत्वें देत असत व हल्लींही देतात.

## २२ बाबांच्या विश्वविद्यापीठांतून शिक्षण घेतलेला व घेत असलेला छात्रगण

बाबांच्या विश्वविद्यापीठांतून शिक्षण घेतलेले व घेत असलेले शिष्य, छात्र व विद्यार्थी, ह्या विश्वांत अनंत आहेत व ते असंख्य ठिकाणीं विखुरले आहेत. त्या सर्वांची परिगणना करण्यास प्रत्यक्ष ब्रह्मदेवही असमर्थ आहे. तथापि पुढच्या पिढींतील भक्तांच्या माहितीकरतां मला अवगत असलेल्या ठोकळ ठोकळ, बाबांच्या प्रत्यक्ष कृपासान्निध्यांत असलेल्या व बाबांना न पाहिलेल्या भक्तवृंदांची एक अति सूक्ष्म परिसंख्या देतों. कोणी कोणी कोणकोणत्या विभागांत कशा कशाचें शिक्षण घेतलें याची वर्गवारी करण्याचें धाडस मी करीत नाहीं. त्या कामीं मी सर्वस्वीं अयोग्य व अपात्र आहें.

मी जी खालीं भक्त छात्रगणांची लघु परिसंख्या देत आहें, ती त्यांच्या, बाबांकडे येण्याच्या कालगणानुक्रमाप्रमाणें देत नाहीं; त्यांच्या नामवर्णानुक्रमाप्रमाणें देत नाहीं; त्यांच्या अस्तित्व, नास्तित्व क्रमाप्रमाणें किंवा अधिकारानधिकारपरत्वें ही देत नाहीं. परंतु बाबांच्या विश्वविद्यापीठांत, अनेक निरनिराळे प्रकारच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष शिक्षणामुळें संसारांत राहून वा न राहून, कोण कोणाचे ठिकाणीं सम्यक् ज्ञान व तीव्र वैराग्य उत्पन्न झालें, अपरिग्रहाचें तत्त्व अंतःकरणांत बाणून कोणकोणाचे आचरणांत त्याप्रमाणें कृति दिसू लागली;

२ संसारांत राहून बाबांनीं वेळोवेळीं कृपेनें दिलेले शिक्षणाचे पाठ अंतःकरणपूर्वक कोणीकोणी गिरविले व हल्लींही गिरवीत आहेत, बाबांच्या आज्ञा शिरसामान्य करून तदनुसार कोणी वर्तन केलें व कोण हल्लींही करीत आहेत;

३ बाबांचें पुण्य पाऊल शिरडींत पडल्यापासून त्यांची भक्तिभावपूर्वक राहण्याची, खाण्यापिण्याची, चिलीम तमाखूची व्यवस्था व दररोज वास्तपुस्त करून सत्य संतसेवेच्या अत्युत्तम शिक्षणाचा लाभ कोणी घेतला;

४ त्याचप्रमाणें वेळीं, अवेळीं, न कंटाळतां, बाबांना ओली भिक्षा दररोज घालून आमरण संतसेवामृत मधुरपानाचें गोड शिक्षण कोणकोणत्या भक्तमायभगिनींना लाभलें;

५ व तसेंच बाबांची दिव्य काया दृष्टिआड झाल्यावर पांच वर्षांनीं म्हणजे शके १८४५ सालापासून, बाबांच्या विश्वविद्यापीठांत शिक्षण घेतलेल्या व घेत असलेल्या

भक्तांपैकीं बाबांच्या संस्थानच्या कामाचा पुढील कार्यक्रम ठरवून घेण्यांत आद्यप्रवर्तक कोण झाले, त्याप्रमाणें व्यवस्था करण्यांत अग्रेसरत्व कोणी पत्करिलें, शि. सं. सभा कोणी स्थापन केली, श्री साइलीला मासिक चालू करण्यास कोणी प्रारंभ केला, शिरडी संस्थान निधि जमविण्याकरतां कोण बाहेर पडले; श्री. भ. गीतेतील अ. १७ श्लो. २० वरील भगवान ज्ञानेश्वर भाष्य २६५ पासून २८४ पर्यंत ओव्यांत सांगितल्याप्रमाणें कायमचें सात्विक दान बाबांना कोणी दिलें; शि. सं. सभेंत अंतःकरणपूर्वक, कर्तव्यबुद्धीनें, निरहंकार वृत्तीनें विनामूल्य कोणी काम केलें व हल्लीं कोण करीत आहेत, अशा क्रमानें मी ही परिसंख्या देत आहें. व तिथें स्थूल दृष्टया व अल्पमत्या पांच वर्ग कल्पिले आहेत.

## भक्त परिसंख्या

### वर्ग २

कै. १ श्री. सुंदराबाई क्षीरसागर उर्फ राधाकृष्ण आई, अहमदनगर निवासी. शिरडी संस्थानास संस्थानचें स्वरूप देणाऱ्या मूळ कार्यकर्त्या. विरक्त अपरिग्रही.

कै. २ ,, अबदुलभाई जुवे सेवक, विरक्त अपरिग्रही.

कै. ३ ,, मेघा गुजराथी ब्राह्मण बाबांची नित्य पूजा, आरती करणारा विरक्त अपरिग्रही.

कै. ४ ,, म्हाळसापती सोनार शिरडी. बाबांचे जुने निस्सीम भक्त. विरक्त अपरिग्रही.

कै. ५ ,, बाळासाहेब भाटे बडोदे. सेवानिवृत्त मामलतदार विरक्त.

कै. ६ ,, नानावली ब्राह्मण देशपांडे चिपळूण. विरक्त अपरिग्रही.

कै. ७ ,, उपासनी महाराज विरक्त.

कै. ८ ,, मुक्ताराम विरक्त.

कै. ९ ,, भाऊराव कुंभार, रस्ते झाडण्याचें काम करणारे. विरक्त, अपरिग्रही.

कै. १० ,, मेहेरबाबा मुंबई, विरक्त.

कै. ११ ,, तुळशीराम भिका कोते, शिरडी विरक्त, अपरिग्रही.

कै. १२ ,, बाळकराम मानकर विरक्त, अपरिग्रही.

कै. १३ श्री. माळीबुवा कोल्हापूर संस्थानांतील बावडे संस्थानांपैकीं एका गांवचे निवासी. विरक्त, अपरिग्रही.

कै. १४ ,, म्हाळसादेवी उर्फ म्हाळी नामदेव आबा सावंत. कसरवाडी ता. संगनेर. विरक्त, अपरिग्रही.

कै. १५ ,, बी. व्ही. नरसिंहस्वामी, मद्रासनिवासी विरक्त.

कै. १६ ,, नानासाहेब निमोणकर, निमोण रहिवासी, निस्सीम भक्त.

कै. १७ ,, नानासाहेब डेंगळे, निमगांव, निस्सीम भक्त.

कै. १८ ,, माधवराव बळवंत देशपांडे, शिरडी. बाबांची सख्यभक्ति करणारे. बाबांचे शिष्या.

कै. १८ ,, तात्याबा गणपतराव पाटील, कोते शिरडी. बाबांशीं लडिवाळपणं खेळणारे.

कै. १९ ,, दामोदर सावळाराम ऊर्फ दामू अण्णा राशने, अहमदनगर, निस्सीम भक्त.

कै. २० ,, नारायण गोविंद ऊर्फ नानासाहेब चांदोरकर, डे. कलेक्टर कल्याण, निस्सीम भक्त, सात्विक दान करणारे.

कै.२१ श्री. गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे ऊर्फ दासगणू महाराज, निस्सीम भक्त.

कै.२२ ,, सखाराम बळवंत ऊर्फ भाऊसाहेब धुमाळ, नाशिक, प्रख्यात वकील, निस्सीम भक्त.

कै.२३ ,, हरी सीताराम ऊर्फ बाळासाहेब दीक्षित, सॉलिसिटर, विलेपारले, शि. सं. कमिटीचे आद्यप्रवर्तक, निस्सीम भक्त.

कै.२४ ,, गोविंद रघुनाथ ऊर्फ अण्णासाहेब दाभोळकर, वांद्रे, सेवानिवृत्त फ. क्ला. म. निस्सीम भक्त.

कै.२५ ,, दामोदर घनःशाम बाबरे ऊर्फ अण्णा चिंचणकर, चिंचणी, सात्विक दान करणारे, निस्सीम भक्त.

कै.२६ ,, सखाराम हरी ऊर्फ बापूसाहेब जोग भिवंडी, सब इंजिनिअर. निस्सीम भक्त.

कै.२७ ,, गोपाळराव ऊर्फ बापूसाहेब बुटी, लक्षाधीश नागपूर. बाबांचें मंदिर बांधून १ नंबरचें सात्विक दान करणारे निस्सीम भक्त.

क.२८ ,, तात्यासाहेब नूलकर सबजज्ज पंढरपूर, निस्सीम भक्त.

कै.२९ ,, गणेश दामोदर ऊर्फ दादा केळकर सेवानिवृत्त रेंज फॉरेस्ट ऑफिसर शिरडी, निस्सीम भक्त.

कै.३० ,, हरी विनायक ऊर्फ तात्यासाहेब साठे, डे. कलेक्टर दिवाण बहादुर पुणें, निस्सीम भक्त.

कै.३१ ,, रघुवीर भास्कर पुरंदरे, वांद्रें निस्सीम भक्त. शि. सं. कमिटीचे सभासद.

कै.३२ श्री. रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान हायकोर्ट वकील सांताक्रूझ, शि. स. कमिटीचे विश्वास्त निस्सीम भक्त. श्रीसाईबाबा ऑफ शिरडी या इंग्रजी लेखाचे संपादक. सात्विक दानकर्ते. बाबांच्या बागेकरतां जागा विकत घेऊन संस्थानास दिली.

कै.३३ ,, गणेश गोविंद नरके, पुणें. प्रोफेसर इंजिनिअरिंग कॉलेज पुणें, निस्सीम भक्त.

कै.३४ ,, बाळकृष्ण विश्वनाथ देव, ठाणें. बाबांचें बाळ. शि. सं. कमिटी विश्वस्त.

कै.३५ ,, केशव रामचंद्र प्रधान, भिवपुरी ता. कर्जत, जि. कुलाबा, निस्सीम भक्त.

कै.३६ ,, रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर, मुंबई हायकोर्ट वकील, शिरडी येथील त्यांचा वाडा शिरडी संस्थानास बक्षिस देऊन सात्विक दान करणारे निस्सीम भक्त.

कै.३७ ,, गोपाळराव गुंड, धोंड्याचें घर शिरडी संस्थानास देऊन सात्विक दान करणारे निस्सीम भक्त.

कै.३८ ,, व्यंकट लिंबाजी कोडल, बाबांच्या मंदिरांत संगमरवरी दगडांची फरशी करून सात्विक दान करणारे.

### वर्ग २ रा

कै.३९ ,, काशिराम शिंपी शिरडी. प्रथमपासून बाबांची सेवा करणारा निस्सीम भक्त.

कै.४० ,, आपा जागले, भिल शिरडी. बाबा शिरडींत आल्यापासून त्यांची सेवा करणारा निस्सीम भक्त.

श्रीसाईबाबासः—

## ॥ श्री साई ॥

( चाल—ही अशीच निशिदिनीं टाकी गडे मोहनी )

ही तुझीच सारी कृपा असे प्रेमला ।
सदैव तुजला माझी अठवण ।
प्रेमरसाची करिशि पाखरण ।
करशी माझें पालनपोषण
राहिले उणे कुठे याजला ॥ ध्रृ ॥ ही तुझीच०

( २ )

कशास चिंता उगाच करूं मी ।
सदैव असतां तूं मम धामीं ।
कोण तुझ्याविण येईल कामीं ।
समजले पुरे अतां याजला ॥ ध्रृ ॥ ही तुझीच०

[ ३ ]

असेच माझें चालो जीवन ।
सूत्र हालवो "साई दयाघन" ।
कधीच केलें आत्मसमर्पण ।
सद्गुरो तुझ्या घरीं प्रेमला ॥ ध्रृ ॥

—"साईदास"

---

## देणगी

१ श्री. सी. आर. श्रीनिवास, औरंगाबाद २ गलेफ दोन. एक सोनेरी रंग तांबडा व दुसरा सोनेरी रेशमी हिरव्या टिकल्या फुलाचा.

३ श्री. एस. बी. केशवय्या सबरजिष्टर पेनुकोंडा. पांच हातीं धोतरपान एक किनार रंग ( चाकलेट नक्षी )

४ श्री. शेट चिमणलाल माणिकलाल जव्हेरी मुंबई नं. ७ गलेफ पिवळा शर्टिंग किनार हिरवी.

५ श्री. व्ही. एस. सुब्रण्णा गुदलीयार सिकंदराबाद, सव्वावार सुतीकापड.

६ श्री. सावळेराम उखा सोनार, फिटर गोदावरी शुगर कं. सावळविहीर. चांदीचे कान दोन

७ श्री. नटेशन के. के. हायस्कूल वेलूर डि. सेलम. बनारसी शेला जरीकाठी ( रंग तांबडा )

८ श्री. एन. सत्यनारायण स्टेशन मास्तर **पोटलचरू** उपरणे सुतीपान एक किनार काळी दाभणकाठी.

5298

## धर्मकृत्य

अभिषेक, अर्चन, नैवेद्य, ब्राम्हण सुवाशिण भोजन, लघुरुद्र वगैरे नेहमीं-प्रमाणें झाले.

अन्नदान ( महार, मांग, भिल्ल, वडार वगैरे ) गोरगरिबांस अमटीभाताचें भोजन देण्यांत आलें.

## कीर्तन

संस्थान गवई यांचीं ६ कीर्तनें श्रीमंदिरांत झालीं. ती ( श्री. भाऊराव कुंभार ) पुण्यतिथी, श्री. अक्कलकोटपुण्यतिथी, परशुरामजयंती, नृसिंहजयंती, वैशाख शु. ११ व वैशाख व० ११ अशीं कीर्तनें झालीं.

## नवलविशेष

श्री. प. प. नारायण आश्रमस्वामी ( पूर्वाश्रमीचे बाबांचे भक्त श्री. टोसर ) यांचे श्री. तुलसीरामायण हिंदी, नाथभागवत, दत्तप्रबोध व सच्चरित या चार ग्रंथांचें पारायण कै. दीक्षित वाड्यांत चालू आहे.

शिर्डीचें हवापाणी उत्तम.

---

# शिर्डीवृत्त

## मार्च १९४३

या महिन्यांत गुंटकल, पाटणा, सिकंदराबाद, पुणें, नगर, देवळाली, मुंबई, डोंबिवली, कल्याण, काळाहस्ती, कोइमतुर, बडोदा, नागपूर, सोलापूर, इगमोर, बेंगलूर, मनमाड, कुन्नुर, लाहोर, कल्याती, मद्रास, म्हैसूर, चित्तुर, करनूल, रायगडा, दौंड, नारंगीडोंगरफोडा. ( जि. ठाणा ) वगैरे गांवचे भक्त श्रींचे दर्शनास येऊन गेले.

## देणगी

श्री. व्ही. श्रीनिवासचारी ब्राह्मणवाडा माटुंगा ( मुंबई ) चांदीचा द्राक्ष. श्री. भास्कर खंडेराव जुन्नरकर, राजगुरु पोळ बडोदें, गलेफ हिरवा. श्री. नानासाहेब शंकरराव माळुसरे ( कोन्हाळकर ) हवालदार ( सिंदियास फिल्ड ॲटिली कींग रोड ) केट्टा, चांदीची वाटी. श्री. अहमदाबाई सजनभाई मु. राजूर ( जि. नगर ) चांदीचे डोळे नग दोन.

फोटो ( प्रो. कै. गणपतराव नरके ) यांचा श्रीमंदिरांत लावणेसाठीं हस्तें श्री. वासुदेव गणेश नरके श्रीसाईनाथभुवन, शिवाजी नगर पुणें.

## धर्मकृत्य

अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, नैवेद्य, ब्राह्मणसुवाशिण अशीं नेहमींप्रमाणें धर्मकृत्यें भक्तांकडून झालीं.

श्री. नानासाहेब खारकर, चार ब्राह्मणसुवाशिण भोजन व श्रीस नैवेद्य.

श्री. वा. ग. नरके पुणें, श्रीस नैवेद्य, ब्राह्मणसुवाशिण भोजन.

श्री. शरश्चंद्र विनायक खोपकर, स्टेशनमास्तर पाकणी. श्रीसत्यनारायण पूजा, नैवेद्य, ब्राह्मणसुवाशिण भोजन.

## कीर्तन

संस्थान गवई यांचीं माघ वद्य ११, फाल्गुन शुद्ध ११, श्रीतुकाराम बीज, श्रीएकनाथशष्ठी अशीं चार कीर्तनें झालीं.

## नवलविशेष

महाशिवरात्रनिमित्त श्रीस मंगलस्नान, गांवांतून श्रीच्या पालखीची मिरवणूक असा कार्यक्रम झाला. मे. डि. से. जज्जसाहेब बहादूर अहमदनगर यांची स्वारी उभयतां श्रींचे दर्शनास आली होती. बरोबर मे. मामलेदारसाहेब कोपरगांव, मे. मुनसफसाहेब कोपरगांव, वगैरे मंडळी होती. रंगपंचमीनिमित्त श्रीच्या रथाची मिरवणूक झाली.

# एप्रिल १९४३

या महिन्यांत सिकंदराबाद, गुंटूर, मद्रास, वेल्लोर, दादर, मुंबई, अहमदनगर, अनंतापूर, नागपूर, श्रीरंग, तंजावर, बोर्डी, सांताक्रूझ, ठाणें, अंधेरी, विलेपारले, पंढरपूर, पुणें, नाशिक, नांदेड, उमरी, मुखेड, गोरटे, कुंभकोण, बल्लारी, चिदंबरम्, नेल्लोर, मिरजगांव, वालटेर, चित्तलागूर, बंगलूर, मैलापूर, हैद्राबाद, इंदौर, परभणी, पाथरी, अजेगांव, कलमनुरी, पारनेर, कोपरगांव, यावल, कल्याण, एल्लोर, येवला, मनमाड, करंबूर, मालाड, माहिम, पांडिचरी, हैद्राबाद (सिंध), टिचूर (कोचिनस्टेट), कौंकुटला, अडोनी, करूर, त्रिचनापल्ली, तिरुपती, चित्तुर, पदुकोटा, जालंदर, चिंगलपट्टा, तिरुकुपन, अनंतापूर, औरंगाबाद, लासलगाव, कंदकूर वगैरे गांवचे भक्त श्रीचे दर्शनास येऊन गेले.

## देणगी

श्री. एन. के. व्यंकटेसम् अनंतापूर. चांदीच्या बांगड्या चार. श्री. व्यंकटराम नायडू क्लार्क डि. बोर्ड नेल्लोर जरीकाठी उपरणें (कोईमतुरी). श्री. व्यंकटदास गिरिधरदास पारेख ७७० रविवारपेठ पुणें, पितळी घंटा. श्री. जन्नती मनुभाई अस्तगांव चांदीची गोळी. श्री. डी. दुर्गैय्या नायडू रेलवे इ० वालटेर, गलेफ जरीकिनार पोपटी रंगाचा. श्री. कु. कामाक्षी c/o ए. रामनाक्षन से. पी. डब्ल्यू. डी. नागपूर. गलेफ हिरवातांबडा सिल्क बार्डरचा. श्री. के. व्ही. ब्रह्मैय्याशेट्टी–पो. कंदकूर डि. नेल्लोर पितांबर जरीकाठी (गंगाजमनी). श्री. शामराव हरि सुखटणकर, खोताची वाडी, खंडेरावची चाळ, मुंबई. चांदीची अत्तरदाणी व वाटी. श्री. सौ. पार्वतीबाई बापुराव बोरावके, शिर्डी गुलाबी रेशमी (बनारसी) शेला जरीकाठी. श्री. बी. आर. रंगनाथन् लोकलआडीट आफीसर नगर, चांदीचें उदबत्तीचें घर. श्री. अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे. सं. इचलकरंजी, चांदीचा लहान पाळणा. श्री. सच्चिदानंद मोरवाले ओरिएंटल लाइफ ऑफीस मुंबई, फलंग रंग हिरवा. श्री. टी. एल. एस. मनीअय्यर कुंभकोणम्, बनारसी हिरवा शेला.

श्री. टी. आर. सुब्बाअय्यर ॲडव्होकेट, बळयपेट बेंगलूर, उदबत्तीचे पितळी झाड. कै. दा. सा. रासने हिरवें निशाण, हस्तें नानासाहेब रासने. श्री. बी. जी. कुलकर्णी क्लार्क कोर्ट कोपरगांव, चांदीचा लहान पाळणा. श्री. नसरतज्यान पो.पालम–जि. परभणी (निझामस्टेट) सुती शाल हिरवी. श्री. पुंजाबा अबाजी पाटील मु. जरुळ ता. वैजापूर लहान काचेची हंडी. श्री. नुरमहंमद पठाण शिर्डी, गलेफ हिरवा. श्री. वझिरभाई शिर्डी, गलेफ हिरवा. कै. लक्ष्मण गोविंद मुंगी कद (रेशमी) रंग केशरी, हस्ते कृष्णाजी लक्ष्मण मुंगी. मेनरोड घ. नं ४३ नाशिक. श्री. जी. नामय्या चेट्टी. १०९ वरदमुथियापन् रस्ता जी. टी. मद्रास, बनारसी शेला रेशमी जरीकाठी रंग हिरवा व चांदीचे उदबत्तीचे घर. श्री. सौ. शालिनीबाई बाळकृष्ण प्रधान सामंतवाडी, गोरेगांव, चांदीच्या पादुका जोड. श्री. केशवराव नाथोबा जोशी प्रकाश बिल्डिंग वायरोड उत्तर माहीम (मुंबई नं. १६) गुलाबी जरीकाठी रेशमी फेटा. श्री. बाळाजीराव गोपाळराव देशमुख मौजे गोरटे जि. नांदेड. चांदीचा घोडा. श्री. एम्. व्हीं. पारेख चीफ केमिस्ट् गोदावरी शुगर मि. सावळविहीर सुती चादर वेलबुट्टी नक्षीची. श्री. डॉ. वासुदेव रघुनाथ तळवलकर इंदौर, जरीकाठी उपरणे. श्री. सौ. सुनंदा दिनानाथ कीर्तीकर, साईनिवास माहीम, हिरवा जरीकाठी शेला. श्री. पिरोजबाई कोठारे, साईनिवास माहीम, जरीकाठी शेला रंग भगवा. श्री. द्वारकानाथ शेट ठाकूर मु. येवला, लोखंडी नगारा लहान मोठा, नग दोन मढविलेला. श्री. गणपत रामकृष्ण बोर्लीकर काळबादेवी मुंबई, तांदुळ पोतें एक. श्री. बाळाजी गोविंद रासने घासगल्ली नगर, तांदुळ पोतें एक. सौ. शेवंतीबाई सवाजी मल्डुनी जि. नाशिक, रुपयाचा पाळणा. श्री. कु. कामाक्षी ए. रामनाथम्, सेंट्रल पी. ड. डी. नागपूर कापडाचे तुकडे (जरीच्या फीतीचे.)

## धर्मकृत्य

अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, नैवेद्य, ब्राम्हणसुवाशिण भोजन वगैरे नेहमीप्रमाणें झालें.

**विशेष**—रामनवमीचे उत्सवांत बरींच धर्मकृत्यें झालीं.

## कीर्तन

श्रीरामनवमीउत्सवाप्रीत्यर्थ श्री. वासुदेवबुवा कोकलेगांवकर, श्री. ह. भ. प. दासगणूमहाराज, श्री. किसनबुवा कासार पाथरी, श्री. भगवानराव मांजरमकर, अनंतबुवा आठवले, संस्थान गवई यांचे चैत्र व. ११.

## नवलविशेष

श्रीरामनवमी उत्सवास मद्रासकडील भक्तमंडळी बरीच आली होती. श्री. शामराव हरी सुखटणकर, मुंबई यांनीं श्रीमंदिरांत गायन, हार्मोनियम वादनाची हजेरी दिली.

श्री. श्रीमातिबाई नार्वेकर, मुंबई यांनीं श्रीमंदिरांत गायनाची हजेरी दिली.

श्री. कु. सुधाताई रामचंद्र कर्णिक, अहमदनगर यांनीं श्रीमंदिरांत गायनाची हजेरी दिली.

श्रीरामनवमी उत्सवाचा अहवाल निराळा प्रसिद्ध होईल तो कार्यक्रम यांत नाहीं. शिर्डीचें हवापाणी उत्तम. उन्हाळा कडक.

## मे १९४३

या महिन्यांत धार, मुंबई, नेल्लोर, मनमाड, वालीवालम् (तंजावर) बल्लारी, मद्रास, सिकंदराबाद, अनंतापूर, कडप्पा, पेनुकोंडा, नाशिक, औरंगाबाद, बोलाराम, (हैद्राबाद) बेंगलूर, अंकाई, बेझवाडा, पुणें, हिंदूपूर, कृष्णागिरी, सेलम्, गुडगूपेठ, गुंटुर, कोल्हार (म्हैसूर स्टेट), जत, माटुंगा, कोमलवयाकुत्तालम्, संतस्टेट, मलेश्वरम्. नंद्याळ, करनूल, नागपूर, सावनेर (जि. नागपूर), विल्लीवाकम, वेल्लोर, नेल्लोर, धरमपूर, उणीकिली (डि. कृष्णा), कोचीन (मलबार), वसई, करंबूर, कलकत्ता, विलेपारले. वगैरे गांवचे भक्त श्रींचे दर्शनास येऊन गेले.

---

## एक अनुभव

मी जगन्नाथ शिवानंद पिल्ले. रा. नागपूर सिताबर्डी, सन १९१७ पूर्वी शिर्डी येथें दीक्षीत वाड्यांत आमचे मामा डॉ. पिल्ले यांचेबरोबर राहत असे. माझें मराठी शिक्षण शिर्डी येथेंच झालें आहे. पूर्वी मला लिहितां-वाचतां येत नसे. शिर्डी येथील शाळेंत मराठी चौथे इयत्तेपर्यंत शिक्षण घेतलें. पूर्वी शिर्डीस असतांना मी टाइफॉइडनें आजारी होतो त्या वेळीं औषधोपचाराचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेरीस आमचे मामा डॉ. पिल्ले हे श्रीसाईबाबाकडे माझे आजारपणाबद्दल सांगण्यास गेले. त्या वेळीं त्यांना श्री बाबांनीं खालील उपाय योजण्यांस सांगितलें. दोन खारका, फुफाट्यांत भाजण्यास सांगितलें. नंतर त्या कुट्टून बी काढून त्यांतील एक घास तोंडांत टाकून वर घोटभर कोमट पाणी पिणें व उदी लावण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मामांनीं बिन्हाडीं येऊन केलें. थोडया वेळानें माझा ताप नाहींसा झाला व मला पूर्ण बरें वाटलें; त्यानंतर मी केव्हांही पुढें आजारी झाल्यास वरीलप्रमाणें इलाज करून श्री बाबांची उदी लावीत होतों व त्यांनी मला पूर्ण आराम वाटे. असो श्री बाबांचे समाधीनंतर दर्शनाची फारच उत्कट इच्छा होत असे, परंतु २५।३० वर्षांत तो योग आला नाहीं.

मनांत शिर्डीस दर्शनास जावें असें येई. पण हल्लीं तेथें काय व्यवस्था आहे, आपले ओळखीचे जुने लोक तेथें कोणी आहेत कां नाहींत अशी शंका येई. माझा मुलगा चि. कृष्णा गेल्या वर्षी जून महिन्यांत (मॅनेंजायटीस) मेंदूचे तापानें फार आजारी झाला होता, त्यावेळीं-श्रीसमर्थ साईबाबांच्या उदीनें व त्यांचे कृपेनें त्या तापांतून त्यास बरें वाटलें. श्रीसमर्थ साईबाबांनीं आपली दिव्यदृष्टी त्यावर फेकून त्यास मृत्यूशय्येवरून उठवून आम्हास जन्मोजन्मीं ऋणी करून ठेविलें. पुढें एकच वर्षानें त्यांचा हुकूम म्हणून मला या जूनमध्यें शिर्डीस दर्शनास येण्याची संधी प्राप्त झाली. मी नागपूराहून कांहीं कामानिमित्त हैद्राबाद (डे.) येथें आलों होतों व येथूनच शिर्डीस जावें असें वाटलें. पण पुष्कळ वर्षांत शिर्डीस न गेल्यामुळें शिर्डीस जाण्यायेण्याची, उतरण्याची, खाण्यापिण्याची व्यवस्था हल्लीं कशी आहे याबद्दल कांहींच माहीत नाहीं. असो, उद्यां

शिर्डीस जाण्याकरितां निघूं असा निश्चय करून फिरावयास बाहेर पडलों तों वाटेंत, शिर्डीस नुकतेच जाऊन आलेले श्री. एम्. आर. सिद्धामय्या नांवाचे गृहस्थ भेटले व त्यांची माझी (तोंडओळख) बाकी बोलणें वगैरे कधीं नाहीं, पण या गृहस्थानीं आपले घरीं मला नेलें व शिर्डीची सर्व हकीगत सांगितली. नवीन आणलेला फोटो, लॅकेट वगैरे दाखविलें व उदीप्रसाद दिला. शिर्डीस हल्लीं उतरण्याची व जेवणाची वगैरे व्यवस्था फार उत्तम आहे असें ऐकून आनंद झाला. या गृहस्थांच्या एका बाईस फार जुनी मूळव्याध होती. कित्येक औषधांनीं ती बरी झाली नाहीं परंतु श्रीसाईबाबांच्या भक्तीनें उदीप्रसादानें ती बरी झाली. म्हणून तीही नुकतीच साईबाबांचे दर्शनास शिर्डीस जाऊन आली होती. असो, त्यानंतर मी ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं शिर्डीस निघालों. मनमाड स्टेशनवर उतरलों तों कोपरगांवची गाडी निघून गेली होती. मग मोटारबसनें निघालों व शिर्डीस सुखरूप पोहोंचलो. शिर्डीस जुनी मंडळी कांहीं भेटली. श्रीसाईबाबांच्या दर्शनानें अंतःकरण आनंदानें भरून व सर्व व्यवस्था बाबांच्या कृपेनें उत्तम आहे. प्रवासांत गाडींतून बरीच गर्दी पण मला कांहींच त्रास झाला नाहीं. वेळोवेळीं प्रवास करतांना बाबांची प्रचीति व अनुभव मला दिसून आला. बाबा नेहमी बरं होईल जा. गरिबाचा वाली अल्ला आहे. हें मला पावलोपावलीं पटत होतें. काल गुरुवार. मला येथें या प्रवासाच्या अडचणीमुळें येणें होते कां नाहीं असें वाटलें पण संध्याकाळपर्यंत येथें येऊन पोंचलो. पूर्वी मी बाबांना चावडींत चवरी वारत असे, त्याप्रमाणें रात्रीं चावडीचे वेळीं एका गृहस्थानें एकदम माझे हातांत चवरी दिली. तीही सेवा माऊलीनें अगदीं पूर्वीप्रमाणें करून घेतली. असो गुरुवारी दर्शन, चावडीची सेवा वगैरे अगदीं माझ्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या. याबद्दल जो कांहीं आनंद झाला तो शब्दांनीं वर्णन करतां येत नाहीं. तो प्रत्येकानें भक्तीश्रद्धा ठेवून पाहावा.

क. लो. ही. वि. आपला.

**जे. एस. पिल्ले A. I. R. L.**

नागपूर.

---

# कै. चिंचणीकर ट्रस्ट

## शके १८६४ सालचें उत्पन्न

कै. अण्णा चिंचणकर यांच्या मिळकतीच्या उत्पन्नांतून शिरडी संस्थानास येणाऱ्या तीन चतुर्थांश हिश्याचा शके १८६३ साल अखेरचा हिशोब श्रीसाईलीला अंक ७–८–९ वर्ष १९ सन १९४२ चे पान ८ वर प्रसिद्ध केलेला आहेच. त्यापुढील त्या इस्टेटीच्या ट्रस्टकडून मिळालेला वसुलीचा हिशोब पुढीलप्रमाणें आहे.

शके १८६४ सालांत शिरडी संस्थानास चिंचणकर मिळकतीचे उत्पन्नांतून खर्च-

वेंच वजा जातां शिल्लक राहिलेल्या रकमेंतून तीन चतुर्थांश हिश्याची रक्कम देणें त्याचा तपशील:—

| | | | |
|---|---|---|---|
| १२१० | या सालची वसुली | २२८-१०-३ | या सालचा खर्च |
| १०० | अगाऊ बयाणा | ११६-१-९ | चालू सालचा सरकार धारा. |
| ८२५ | नेवाळे जमिनीची वसुली. | १००-०-० | आगाऊ बयाणा रक्कम परत. |
| ८५ | चिंचणीचें उत्पन्न | १-०-० | कोर्ट खर्च |
| २५ | जमिनीचे | १०-६-० | प्रवास खर्च |
| ६० | वाडीचे, मागील दोन वर्षांचे थकलेले सुद्धां | १-२-६ | टपाल खर्च |
| २०० | वेढे जमिनीच्या विक्री हुकूमनाम्याच्या रकमेची भरपाई | | |
| १२१० | | २२८-१०-३ | |

एकूण शिल्लक ९८१-५-९ याचा $\frac{3}{4}$ = ७३६-४-०

आज रोजीं रक्कम ( ७३६-४-० ) श्री. श्री. ना. खारकर, शि. सं. प्र. सचिव ठाणें यांस समक्ष दिली.

(सही)

श्री. ना. खारकर
ऑ. चि. शि. सं. क. ३७ चरई रोड, ठाणें.
ता. २४-६-४३

**बाळकृष्ण विश्वनाथ देव.**
कै. चिंचणीकर यांचे विश्वस्तापैकीं एक विश्वस्त. २४-६-४३.

# श्री साईबाबा



श्री साईबाबा शिरडी संस्थानच्या भक्त मंडळाची २२ वी वार्षिक सभा तारीख १८-७-४३ रविवार रोजीं दुपारीं तीन वाजतां शिरडी येथें दीक्षित वाड्यांत भरणार आहे; तरी त्यावेळीं सर्व सभासदांनीं अवश्य हजर रहावें.

## सभेपुढें निघणारीं कामें

१. ता. २८-७-४२ च्या सभेचे टिपण मंजूर करणें.

२. सन १९४२ ( १-१-४२ ते ३१-१२-४२ ) चा ऑडीट झालेला आढावा मंजूर करणें.

३. अध्यक्षांचे परवानगीनें वेळींच विचारांत घेण्यांत येणारीं कामें.

**ता. १-७-४३**
३७ चरई रोड, ठाणें.

**श्री. ना. खारकर**
ऑ. चिटणीस, शि. सं. क.

---

# श्री साईबाबा

श्री साईबाबांच्या शिरडी संस्थानच्या सन १९४२ सालच्या जमाखर्चाचे आढावा-पत्रक संस्थानच्या सन्माननीय ऑडिटरांनीं तपासून दिलेलें संस्थान कमिटीनें स्वीकारून, संस्थानच्या स्कीम योजनेप्रमाणें संस्थानच्या भ. मंडळाच्या सभेपुढें तें स्वीकारावें अशा शिफारसीनें शिरडी येथें गु. पौ. उत्सवांत बोलाविलेलें भ. मंडळाचे वार्षिक सभेपुढें सं. कमिटिमार्फत मांडणेंत येणार आहे. सदर पत्रकाच्या छापील प्रति भ. मं. चे सभासदांकडे आगाऊ पाठविण्यांत येत आहेत.

या पत्रकांतील ठराविक खात्यांचे वसुली व खर्चाचे आंकडे संस्थानचा कारभार कशा दक्षतेनें चालविला जात आहे व संस्थानची सर्वतोपरीनें कशी भरभराट व वाढ होत आहे याची जाणीव देतीलच.

संस्थान स्कीम अन्वयें मूळ ठोकळ अशी खातीं तीनच (का. फं., कोठी व उत्सव) आहेत व त्यांतच चवथें खातें साईलीला जें संस्थाननें मागाहून स्वीकारलें आहे त्याचा व त्याशिवाय कै. आण्णा चिंचणीकर ट्रस्ट, इमारत व सभामंडप व साईमाई ठेव (अनामत) यांचा समावेश होतो.

**कायम फंड**—या खातीं येणारा पैसा सिक्युरिटीज घेऊन या निधीचे रकमेवर येणारें व्याज यावरच इतर खात्यांचे अभावीं संस्थानचा कारभार चालविणेंचा आहे. साल अखेर रु. ६३२०० कसे झाले हें मागील रिपोर्टमध्यें नमूद आहे. सं. कमिटीनें हिशोब तपासून होण्यापूर्वी साधारण हिशोब करून ता. १९–१–४३ रोजीं द. कि. रु. ७००० सात हजारांचे सरकारी रोखे घेतले. आढाव्यावरून आपणांस कळेल कीं, साल अखेर का. फं. रु. २५४३ जमला, परंतु त्यांत इतर बचत घालून वरीलप्रमाणें रोखे घेतले. आज का. फं. रु. ७०२०० चा झाला आहे व कमिटी १९४३ सालाचाहि हिशोब पाहून आणखी द. किं. १५००० पंधरा हजारचे रोखे घेणार आहे.

**कोठी**—या खातीं येणाऱ्या पैशांतून संस्थानचा सर्व खर्च चालविण्याचा असतो व कमी आल्यास कायम निधीचे व्याजाचा उपयोग करण्याचा असतो. या खातीं हल्लीं पैसाही पुष्कळ वसूल होतो व त्याची विगतवार योजना व खर्चाच्या बाबतींत शिस्त व काटकसरीचें धोरण आंखलें गेलें असल्यामुळें हे खातें तूर्त पुष्कळच बचतीचें होऊन बसलें आहे व ही योजना अशीच चालू राहिल्यास हे खातें संस्थानच्या सर्वांग वाढीस कसें कारणीभूत होत आहे याची जाणीव गेल्या दोन वर्षांत श्रींचे दर्शनास वेळोवेळीं येऊन जाणारे भक्तांचे निदर्शनास आली असेलच.

**उत्सव**—या बाबतींत विचार करण्यासारखें कांहीं नाहीं. प्रत्येक उत्सवाकरितां भक्तांकडून वर्गण्या येतात व त्यांतूनच उत्सव पार पडतात. इतकेंच नव्हे तर गुरुपौर्णिमा उत्सव संस्थानकडे आल्यापासून त्या उत्सव वसुलींतून उत्सव कार्य पुरें होऊन पूर्वी उत्सव करणारास पदर भर घालावी लागत असे त्याऐवजीं हल्लीं शिल्लक राहून संस्थान फंडाचे वाढीस मदत होत आहे. श्रीरामनवमी उत्सवाचे हिशेबाची बाब मात्र अद्याप समाधानकारकपणें उलगडलेली नाहीं असें ऑडिटरांचे पत्रावरून दिसून येईल. तरी त्याबाबत संस्थान योग्य विचार करून या बाबीचा समाधानकारक उलगडा लावण्याच्या खटपटींत आहेच.

53

**साई लीला**—ही बाब मात्र संस्थानचे खर्चाची होऊन बसली आहे व तो प्रश्न सोडविण्याचा संस्थान प्रयत्न करीत आहे.

## इतर खातीं

**इमारत व सभा मंडप**—(१)युद्धपरिस्थितीमुळें या खातीं होणारी वसुली हातीं राखण्यापलीकडे मार्ग नाहीं. ही जमा इअर-मार्क करून सरकारी रोख्यांत ठेवण्याचे सं. कमिटीनें ठरविलें आहे. याच इमारत खातीं मद्रासी भक्त श्री. दुर्गिया नायडू यांनीं शिरडी पिलिग्रीम कॉटेज कलेक्शन चालू करून आलेली वसुली त्यांनीं संस्थानकडे देण्याचें ठरविल्याप्रमाणें त्यांचेकडून येणारी वसुली जमा ठेवली जात आहे व सुस्थिति प्रस्थापित झाल्यावर त्या पैशाचा त्यांच्या इच्छेनुरूप संस्थानमार्फतच इमारतीकडे उपयोग करण्याचे उभयपक्षीं ठरलें आहे. त्याचप्रमाणें कॉटेजकरितां घेतलेली जागा संस्थानच्या नांवें करून दिली आहे.

**कै. आण्णा चिंचणीकर ट्रस्ट**—(२) या भक्ताचे मृत्युपत्राप्रमाणें त्यांचे इष्टेटीचे ट्रस्टचे उत्पन्नाचा $\frac{3}{8}$ हिस्सा त्यांनीं शि. संस्थानास दिलेला आहे व त्या इष्टेटीवरील बोजाचे पूर्ण निवारण होऊन अलीकडे २।३ वर्षें या संस्थानास सालीना ५००।७०० रुपये या संस्थानचा $\frac{3}{8}$ हिस्सा म्हणून येऊं लागले आहेत. ही या संस्थानास उत्पन्नाची बाब मिळवून देण्याचें श्रेय श्री. बा. वि. देव, शि. सं. चे एक विश्वस्त व चिंचणकर ट्रस्टचेही एक विश्वस्त यांचे-कडे आहे व हीं शि. संस्थानास मोठी समाधानाची गोष्ट आहे. ता. २४-६-४३ रोजीं शके १८६४ चे $\frac{3}{8}$ उत्पन्नाची रक्कम रु. ७३६-४-० ही या संस्थानास जमा आलेली आहे व ती पुढील आढाव्यांत येईलच.

**साई माई ठेव**—(३) ही एक संस्थान सेविका ( श्रीमती साईमाई, कै. साईभक्त बाळा-साहेब भाटे यांची कन्या ) । हिचे सर्व बाबा अर्पण या आत्मयज्ञाचे द्योतक म्हणून तूर्त तिचेकडून होणारे सर्व आर्थिक अर्पणाची ठेवरूपानें सं. हिशेबी दाखला ठेवण्याकरितां आंखण्यांत आलेली बाब आहे. त्यांत या बाईस सं. मार्फत कोठी व्यवस्था पाहण्याबद्दल म्हणून दरमहा रुपये दहा देणगीरूपानें आदा करण्यांत येणारी रक्कम ती स्वतः स्वीकारीत नसल्यामुळें तिचें नांवें ठेवरूपानें जमा ठेवण्याचें व तिचे पश्चात् ही जमा तिचे खास मर्जीनुरूप बाबा-अर्पण म्हणून संस्थानास जमा घेण्याचें कमिटीनें ठरविलें आहे. याच ठेवी खाती आणखी तिचेकडून स्वतःचे चीजवस्तूची विक्री व वसुली संस्थानास देण्यांत येत असलेली

सर्व रक्कम जमा ठेवण्याचें ठरविलें आहे. याशिवाय तिनें आपली भांडीकुंडी संस्थानास दिलेली आहेतच. संस्थानांत चालू केलेली कोठी योजना दर्शनास येणारे भक्तांचे आदरास पात्र झालेली आहे व त्याचे सर्व श्रेय या बाईचेच निष्काम सेवाव्रताकडे आहे.

अखेर गेल्या सालच्या रिपोर्टांत नमूद केल्याप्रमाणें तरुण, उत्साही, निष्काम व निगर्व भक्तांची या बाबांच्या प्रपंचरूपी गाडा चालविण्याच्या कामीं वाणच आहे; तरी तरुण उत्साही भक्तांनीं हें घ्यानीं आणून ही वाण भरून काढतील अशी आशा आहे.

ता. १-७-४३
३७ चरई रोड, ठाणें.

भ. मंडळाचा नम्र साई सेवक,
**श्री. ना. खारकर**
ऑ. चि. शि. सं. क.

## श्री साईबाबा शिरडी संस्थानचा ता. १ माहे जानेवारी १९४२ त

| जमा | रु. | आ. | पै | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|---|---|---|
| ता. १-१-४२ ला हातीं शिल्लकः— | | | | | | |
| सरकारी रोखे ३½ चे दर्शनीं किंमत रु. ५८,२०० | | | | ४२०२५ | ७ | १ |
| म. प्रॉ. फं. २ शेअर्स | | | | १०० | ० | ० |
| इं. बँ. चालू खातें | ९८० | ५ | ० | | | |
| ,, सेव्हिंग ,, | ७३७२ | ११ | ० | | | |
| पोष्ट ,, ,, | ७६ | १२ | ० | ८४२९ | १२ | ० |
| ऑ. खजिनदार हातीं | ९३९ | ५ | ३ | | | |
| ,, डु. खजिनदार ,, | ० | ६ | ० | | | |
| ,, चिटणीस ,, | ७०२ | ० | ७ | | | |
| कोठीकारभारी शिरडी हातीं | १२२ | १५ | ६ | १७६४ | ११ | ४ |
| **जमाः—** | | | | | | |
| कायम फंड | | | | २५४३ | १४ | ० |
| कोठी ( धर्मकृत्यें रोषणाई नैवेद्य वगैरे ) | | | | १६७२६ | १० | ११ |
| पेट्या ( धर्मदाय ) | | | | ७०१ | १ | ३ |
| भाडें ( शीरडी ) | | | | ८० | ० | ० |
| व्याज | | | | २२५१ | ८ | ३ |
| सामान विक्री | | | | ७७६ | ३ | ० |
| **उत्सवः—** | | | | | | |
| रामनवमी | ५७७ | २ | ६ | | | |
| गुरुपौर्णिमा | ८८० | १३ | ६ | | | |
| गो. अष्टमी | १९ | ० | ३ | | | |
| पुण्यतिथी | १३९५ | ५ | ९ | | | |
| दत्तजयंति | २ | ० | ० | २८७४ | ६ | ० |
| पुस्तकविक्री | | | | ४०४ | ३ | ३ |
| साईलीला वर्गणी | | | | ३९५ | ९ | ० |
| चिंचणकर ट्रस्टकडून शके १८६३ सालचें उत्पन्न | | | | ६७३ | ८ | ० |
| इमारत फंड | | | | २७७७ | ४ | ० |
| साईमाईची ठेव ( अनामत ) | | | | २७५ | ० | ० |
| | | | | ८२७९९ | २ | १ |

संस्थानची स्थावर मिळकत आजमासें रु. १७,००० ची आहे.

संस्थानची जंगम मिळकत आजमासे किंमतीची आहेः—

चांदीची भांडीं रु. ४०००, पितळ-तांब्याचीं भांडीं रु. १६२५.

कपडे रु. १५९३ बैठकीचें सामान रु. २०० फर्निचर दिवे वगैरे रु. २,०००.

Moreswar W. Pradhan
V. N. Gorakshaker
Y. J. Galvankar
Trustees.

R. V. Ghaisas, ऑ. खजिनदार.
S. N. Kharkar, ऑ. चिटणीस.

## ता. ३१ माहे दिसेंबर सन १९४२ चे जमाखर्चाचा तक्ता.

| खर्च | रु. | आ. | पै | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|---|---|---|
| कोठी ( धर्मकृत्यें, रोषणाई, नैवेद्य वगैरे ) | | | | ९४०६ | ७ | ६ |
| इमारत खर्च | | | | ४८६२ | २ | ६ |
| **उत्सवः—** | | | | | | |
| रामनवमी | ५९३ | १३ | ३ | | | |
| गुरुपौर्णिमा | ५७६ | १२ | ६ | | | |
| गो. अष्टमी | ३० | ४ | ३ | | | |
| पुण्यतिथी | ९८९ | ७ | ० | २१९० | ५ | ० |
| पु. छपाई | | | | ६४८ | ५ | ३ |
| साईलीला | | | | ७८६ | ० | ९ |
| सामान खरेदी | | | | ४४५ | ४ | ६ |
| बँकेमार्फत खर्च | | | | १०२ | १४ | ३ |
| चालू सालीं सरकारी रोखे खरेदी दर्शनी किंमत पडलेली रु. ५००० | ४६४० | १५ | ० | | | |
| पूर्वीची खरेदी दर्शनीं किंमत पडलेली रु. ५८२०० | ४२०२५ | ७ | १ | ४६६६६ | ६ | १ |
| म. प्रॉ. फंड २ शेअर्स दर्शनीं पडलेली | | | | १०० | ० | ० |
| इं. बँक चालू खातीं | ६१६१ | ० | ९ | | | |
| ,, सेव्हिंग ,, | ७१०९ | १५ | ० | | | |
| पोष्ट सेव्हिंग ,, | २६२५ | ७ | ३ | १५८९६ | ७ | ० |
| ऑ. दुय्यम ख. हातीं | ७९ | ५ | ० | | | |
| ,, चिटणीस हातीं | ६६१ | ९ | ३ | | | |
